# ज्ञान प्रबोधिनी

## स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण)






**वार्षिक वृत्त**


राष्ट्रीय शके १९४१-४२

(सन २०१९-२०)





# ज्ञान प्रबोधिनी : स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण)

## वार्षिक वृत्त

**राष्ट्रीय सौर शके १९४१-४२ (सन २०१९-२०)**

## अनुक्रमणिका


♦ मनोगत

वृत्त

**१. किशोरी विकास**

जास्वंद गिरीकन्या निवास

**२. युवती विकास**

**३. हिरकणी**

**४. नव चैतन्य दल**

**५. महिला विकास**

**५.१ बचत गट**

**५.२ स्वयंरोजगार प्रशिक्षण**

**५.३ नेतृत्व विकसन**

**❊ विविध प्रकल्प**

१. आरोग्य-सखी

२. नवदिशा

३. टेलिमेडिसिन

४. कातकरी विकास

५. मराठी विकिपीडिया

६. फिल्टर वाटप

७. वॉटर फिल्टर शाळांना भेट

८. डेली कलेक्शन

९. राम-सीता पुराणिक तंत्र निकेतन

१०. ज्येष्ठ नागरिक

११. बालवाडी

**❊ कामावरचा अभ्यास**

**❊ विशेष लेख**

१. आरोग्य फेरी

२. २५ वर्षं पूर्ण!

३. गावचा दाखला

४. करोना आपद मदत कार्य


### मनोगत

बचत गटापासून सुरू झालेल्या स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण) कामाचे हे रौप्य महोत्सवी म्हणजेच २५ वे वर्ष! स्त्री-शक्ती प्रबोधन ही प्रबोधिनीची कार्यादिशा. ग्रामीण भागातले स्त्री-शक्ती प्रबोधन कार्यादिशेचे काम या विभागाद्वारे चालते. सातत्याने चालू असणाऱ्या या कामाने एरवी सहज वाटणाऱ्या स्त्री-शक्ती प्रबोधनाच्या अनेक मिती आजपर्यंत उलगडून दाखवल्या. त्या कामामुळे अनेकींच्या आयुष्यात महत्त्वाचे विधायक बदल झाले. स्त्री शक्तीचे काम जाणीवपूर्वक करणाऱ्या महिला गटांची दखल समाजाने, गावाने अगदी त्यांच्या कुटुंबांनी सुद्धा घेतली.

गेल्या काही वर्षांच्या अभ्यासामध्ये त्यातले काही पदरही उलगडत गेले. जसे यशवंतराव चव्हाण मुक्तपीठाच्या परीक्षांना आपण कार्यकर्त्यांना आग्रह करून बसवतो कारण लहानपणी औपचारिक शिक्षण प्रवाहात टिकण्याची संधी, महत्त्व न कळल्यामुळे हरवलेली असते. आपण 'शिकलो नाही' या न्यूनगंडामुळे समोर संधी आली तरी घ्यायला महिला धजावत नाहीत. आपल्या आग्रहामुळे यावर मात करण्यासाठी अनेक जणींनी पुन्हा एकदा शिक्षण प्रवाहात यायचे ठरवले. असे धाडस केलेल्या अनेकींच्या कुटुंबात विधायक बदल झाले. कुटुंबातील त्यांचे स्थान बदलले, त्यांना सन्मान मिळू लागला आणि आता प्रबोधनाचे काम म्हणून त्याच इतरांना 'पुढे शिका' असा संदेश देऊ लागल्या.

प्रबोधनाच्या कामाच्या उपक्रमातील सहभागामुळे कुठे कुणाच्या हातात पैसे खेळते राहिले, कर्ज मिळाले, त्यामुळे मनासारखे काही करता आले तर कुठे स्वतःची राहिलेली हौस 'ती'ने मुलीच्या मागे 'मुलीची आई' म्हणून खंबीरपणे उभी राहून पुरवली... पाठीशी आई आहे अशा विश्वासामुळे मुलीचे भविष्य उजळले!

कुणी मनावर दगड ठेवून लेकीला शिक्षणासाठी घराबाहेर पाठवले तर कोणी सुनेची पोरं सांभाळून सुनेला सामाजिक काम करायला घराबाहेर जाण्याचे स्वातंत्र्य दिले. अशामुळे कधी किशोरी, सैनिकांच्या


**♦ ज्ञान प्रबोधिनी संस्थेचे पदाधिकारी ♦**

□ अध्यक्ष: डॉ. रघुनाथ माशेलकर

□ उपाध्यक्ष: डॉ. विजय केळकर, कि. बा. (अण्णा) हजारे

□ कार्याध्यक्ष: श. बा. तथा रवि पंडित

□ संचालक: डॉ. गिरीश श्री. बापट

□ कार्यवाह: वि. शं./सुभाष देशपांडे

केंद्रात जाऊन रायफल चालवून बघू शकल्या तर कधी युवती कातकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी मत्स्य उत्पादन केंद्र बघून येऊ शकल्या.

रौप्य वर्ष अखेरीला, यंदा जागतिक महिलादिनाच्या निमित्ताने, एक महत्त्वाचा कार्यक्रम घेतला. 'आरोग्य फेरी' काढली. एरवी खूप मोठे वाटणारे १० किलोमीटरचे अंतर चालत-पळत जमेल तसे पार करायचे असा आरोग्याचा विधायक संदेश कृतीतून देण्याचा हा कार्यक्रम होता! या कार्यक्रमाला ८०० हून जास्त महिला सहभागी झाल्या. अनेकींनी १० किमी अंतर सहज पळत पार केले. अगदी त्यात मुली सोबत पळणारी आई अशा जोड्यासुद्धा होत्या, हे विशेष! बघताना असे वाटत होते, की असे काही ठरवायचाच काय तो अवकाश होता.... गट सोबत असला की मग आम्हाला जमेलच! हा संघटनेचा अनुभव गटाने एकत्र घेतला. त्यामुळे 'समकृती समकृती समकार्य' ही आता फक्त बैठकीत म्हणायच्या पद्याची ओळ राहिली नाहीतर हा एकत्र कामाचा प्रत्यक्ष अनुभव गटाने घेतला.

रौप्य महोत्सवी वर्षात किशोरी, युवती, हिरकणी आणि महिला गटाने जे स्थानिक मनुष्यबळ उभे केले ते स्थिर करण्यासाठी त्यांचे समूहगुणविकसनाचे प्रशिक्षण झाले. ६४ जणींच्या निवासी झालेल्या या शिबिरात कार्यपद्धती बरोबरच सहकाऱ्यांचा परिचय झाला. वर्षभरात भरपूर कार्यक्रम झाले, नवीन जबाबदारी घेणारा गट उभा राहिला, रुजला. यातून वाढला तो व्यक्ती-व्यक्तीचा आणि गटाचा आत्मविश्वास!

१९-२० या रौप्य महोत्सवी वर्षात स्त्री-शक्ती प्रबोधनाच्या या ग्रामीण गटाने जणू 'प्रबोधनाची आमची जबाबदारी तर आम्ही उचलूच पण त्या सोबत विकासातला आमच्या योगदानाचा अनुषेशही भरून काढू' अशा निश्चयाने नव्या दमाने कामाला सुरुवात केली आहे. काम करणाऱ्या जबाबदार गटामध्ये किशोरींचा गट घेणारी त्याच उपक्रमातून तयार झालेली थोडी मोठ्ठी ताई आहे तर ज्येष्ठ नागरिकांसाठी त्यांच्या सोबत स्वस्थपणे बोलणारी पन्नाशी उलटलेली परिपक्व महिला पण आहे. या कामाचा भाग झाले म्हणून 'मी बदलले', 'माझा दृष्टीकोन बदलला' असे मोकळेपणे मांडणारा गट उभा राहिला. या गटाचे उठून दिसणारे, जबाबदारी घेणारे कर्तेपण पाहून अनेकींना या गटाचा भाग झाले पाहिजे असे वाटायला लागले. त्यासाठी, नवीन प्रकल्प आखून जिला येण्याची इच्छा आहे तिच्यासाठी आपण कामाची योजना करत आहोत. त्यामुळे, यंदा नवीन अनेक प्रकल्पाची भर पडली आहे. अशा सगळ्या कामाचा प्रवास या वृत्तात नोंदवला आहे. वाचून अभिप्राय नक्की द्या.

*****

## ❖ परदेशी देणगीदार ❖

- आयडीआरएफ ३,५५,०००/-
- ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन २,१३,१५०/-
- प्रभाकर साठे ४०,०००/-

## ❖ भारतातील प्रमुख देणगीदार ❖

(रक्कम रु.)

१०,००,०००/- बजाज होल्डिंग्स अँड इनव्हेस्टमेंट प्रा. लि.
६,०८,०००/- इलेक्ट्रॉनिका
६,००,०००/- एन. जी. परांजपे न्यास
५,००,०००/- आयनोक्स्पा इंडिया प्रा. लि.
१,००,०००/- सुधीर पत्की
५१,०००/- मुकुंद जोशी
५०,०००/- डी.व्ही. ब्रह्मे अँड सन्स
११,०००/- प्रमोद दाडीवाल
२०,०००/- वसंत शिवरामकृष्णन
१०,०००/- प्रत्येकी सुनील चिंचणीकर, नितीन पटवर्धन, विशाखा पंडित, सतीश मराठे, सलील नित्सुरे
८,०००/- मेधा पंचनदीकर
५,०००/- प्रत्येकी : अरुण पुराणिक, प्रमोद जाधव, जगन्नाथ शेट्टी, योगेश बोडस, मेधा माढेकर, अनुराधा सबनीस, वाय. एल. थत्ते, सीमा परांजपे, शुभांगी क्षीरसागर, डॉ. प्रियदर्शन जोगळेकर, एफिशीएंट नेफ्ट डॉ. दीपक कुलकर्णी, अलका पटवर्धन,

संकीर्ण : २५ देणगीदारांनी मिळून रु. ४३,५००/- देणगी जमा केली.

# स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण) वार्षिक वृत्त

## राष्ट्रीय सौर शके १९४१-४२ (सन २०१९-२०)

दरवर्षी प्रमाणेच यंदा महिलांच्या कामाची 'किशोरी', 'युवती', 'हिरकणी' व 'महिला' अशा गटांमध्ये विभागणी केली आहे. त्यानुसार सन २०१९-२०चे वार्षिक वृत्त पुढे देत आहोत.

## किशोरी विकास

या वृत्त कालावधीत किशोरी विकास उपक्रमाचे बहुतेक काम आरोग्य सखी प्रकल्पांतर्गत झाले. त्याचा तपशील पुढे दिला आहे. त्या शिवाय झालेले किशोरी विकासा संबंधित काम खाली दिले आहे -

★ **खेळांचे संच भेट** : वेल्हे तालुक्यातील २२ शाळांना खेळातून शिक्षण मिळेल असे खेळांचे संच, मर्क्स या कंपनीच्या अर्थसाहाय्यातून दिले गेले. ते देण्यासाठी या कंपनीचा २० -२२ जणांचा गट वेल्ह्याच्या शाळेमध्ये आला होता. प्रत्येक शाळेला रु. ३०००/- किंमतीची खेळणी, अशी २२ शाळांना दिली. म्हणजेच एकूण रु. ६६०००/- चे खेळ साहित्य या कंपनीकडून शाळांना भेट म्हणून देण्यात आले.

★ **किशोर-किशोरी विकास** : शिवगंगा खोऱ्यातील कल्याण व कुसगाव या दोन शाळांतील इ. ८वीच्या ४० मुला-मुलींसाठी वर्षभरात एकूण १७ तासिका घेतल्या. या तासिका घेण्यासाठी पुण्यातील संवादिनी गटाच्या ताई येत होत्या. तासिकांच्या माध्यमातून त्यांनी स्त्री-पुरुष परस्पर पूरकता पोचविण्याचा प्रयत्न केला. या उपक्रमाला दोन्ही शाळेतील विद्यार्थ्यांकडून भरभरून प्रतिसाद मिळाला. तास घेणाऱ्या संवादिनीच्या ताईंनी वर्षभर यासाठी चिकाटीने प्रयत्न केले. यामुळे हा उपक्रम यशस्वीपणे पूर्ण झाला.



★ **राखी प्रशिक्षण** : किशोरी विकास उपक्रमांतर्गत राखी पौर्णिमेला लेह, लडाख व विशाखापट्टणम् इथल्या सैनिकांना राख्या पाठविण्यात आल्या. या राख्या क्विलिंग पेपरपासून बनविल्या होत्या. वेल्हे परिसरातील ९० किशोरींनी या राख्या बनविल्या. सैनिकांनी या राख्या बांधून त्याचा फोटोही मुलींना पाठवला.

**जास्वंद गिरीकन्या निवास**

वेल्ह्यामधल्या निवासात यंदा ३१ मुली होत्या. परीक्षांचे निकाल समाधानकारक लागले. १० वीमधील अश्विनी कोंढाळकर ६६%, श्रुतिका ६६.६०%, कोमल ५४.४०%, १२वी वाणिज्य शाखेचा निकाल : सुनीता ७८.१५%, दर्शना ६९.५३% तर TY B.Com ला असलेली सुषमा ७२% मिळवून पहिली आली आणि मंगल ७१% मिळवून तिसरी आली. याचा परिणाम म्हणून प्रवेशाची संख्याही यंदा वाढली. यंदा ४० जणींनी निवासासाठी अर्ज केले. दरवर्षीप्रमाणे अभ्यासाला पूरक शनिवारच्या शाळेचे उपक्रमही झाले. वेल्ह्यातील गणेश विसर्जन मिरवणुकीतील बरचीनृत्य, हिवाळी निवासी शिबिरे, यात्रेतील stall सगळे करून अभ्यासही झाला हे विशेष!

★ **शनिवारची शाळा** : वर्षभरात एकूण ३३ सत्रे झाली. या सत्रांमध्ये वैद्यकीय तज्ज्ञ, शिक्षक, प्रबोधिनीतील तज्ज्ञ अशा अनेक मार्गदर्शकांनी शनिवार शाळेला मार्गदर्शन केले. या सत्रांमध्ये मुलींचे कला-कौशल्य, शारीरिक शिक्षण, भाषेचे व्याकरण, पर्यावरण निरीक्षण, सहली या विषयांची सत्रं घेतली.

**अनुभवाने संपूर्ण सत्र** :- (९वी गटाची सहल) पुरंदर किल्ला, नारायणपूरचा प्रतिबालाजी, बनेश्वर मंदिर व सिंहगड किल्ला या ठिकाणी यात्रेत पाणीपुरीचा स्टॉल लावल्यामुळे मुलींना विक्रीचा अनुभव आला. गणेश उत्सवात गणपतीसमोर बर्चीनृत्य सादरीकरण केले. त्यासाठी ढोल-ताशा ही वाद्ये युवतींनीच वाजवली.

★ **निवासाला मा. संचालकांची भेट व मार्गदर्शन :** मुलींनी संचालकांना निवासाबद्दल तपशीलात निवेदन केले. त्यानंतर संचालकांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, १. आपण आपल्या घरातील छोट्या-छोट्या गोष्टी शिकून घेतल्या पाहिजेत. २. आपल्याला कोणती कामे गटाने करता येतील यावर चर्चा केली. ३. निवासाच्या जवळपास जे ३ किल्ले आहेत ते पाहण्याचे नियोजन करावे. ४. ज्यांना सायकल येते त्यांनी १० ते १५ कि.मी. चालवून पाहिली पाहिजे. शेवटी मा. संचालकांनी अभ्यास सहलीचे स्वतःचे अनुभव संगितले.

★ **पाहुणे भेटी :** अमेरिकेतील शिल्पाताई वैद्य-मेहता यांनी त्यांच्या दोन मुलींसोबत प्रशालेच्या ९वीतील मुलींच्या निवासाला भेट दिली. शिल्पाताईंची मुलगी तन्वीने (इ.३री) तिच्या घराची ppt snow-falling video मुलींना computer वर दाखवला. ताईंनी अमेरिकेतून येताना निवासातील प्रत्येक मुलीसाठी तिच्या नावाचे तिच्या वयाच्या मुलींकडून पत्र लिहून

आणले होते. ती इंग्लिशमधील पत्रे प्रशालेच्या मुलींनी गटागटात बसून वाचली आणि मिळालेल्या पत्राला उत्तर म्हणून प्रत्येकीने पत्र लिहिले. अनेकींनी आयुष्यात प्रथमच असा अनुभव घेतला..

याशिवाय धनश्रीताई व सुधीरदादा यांनी काही सत्रं घेतली. त्यात मुली दीपध्यानाची प्रार्थना शिकल्या. मुलींना बँक संकल्पना समजून दिली. विज्ञानातील अनुवंशिकता पाठ शिकवला. मासिक पाळीविषयी माहिती दिली. वर्तमानकाळातील ५ वाक्ये इंग्रजीत बोलायला मुलींना शिकवली व शौचालयाचे महत्त्व सांगणारे नाटक बसवले. सुधीर दादांनी मुलींना बुद्धिबळ शिकवले. विज्ञानातील sound ही संकल्पना समजावून सांगितली. मुलींना ध्वनीलहरी, सोलार, निर्वात पोकळीत हवा कुठे असते, आहारातील व्हिटॅमिनचे फायदे आणि व्हिटॅमिन कशातून मिळतात ते शोधायला संगितले.

**आरोग्य** :– दात तपासणी– २९ मुलींची दात तपासणी झाली. विकासमित्र प्रकल्पासाठी बाहेरून आलेल्या ६ युवतींनी तपासणी करून घेतली. त्यापैकी निवासातील ६ मुलींचे दात खूप चांगल्या स्थितीत आहेत, त्यांचे डॉक्टरांनी कौतुक केले व त्यांना दुसऱ्या मुली दिवसातून दोन वेळा ब्रश करतात की नाही हे पाहायला संगितले. ३ मुलींना तातडीने पुढच्या रविवारी रूटकॅनलसाठी बोलवले. २९ मुलींची डोळे तपासणी, रक्तगट तपासणी झाली. मानसिक आरोग्य – युवतींसाठी, मानसिक संतुलन कसं हवं, मनावरील ताण कसे कमी करावेत याविषयी संगितले.

## युवती विकास

सुट्टीमध्ये काही विधायक काम करण्याची संधी म्हणून दि. १० एप्रिल ते १० मे २०१९ या कालावधीत वेल्हे भागातील १२वी पुढच्या १२ युवतींनी यंदा महिनाभर पूर्णवेळ काम केले. प्रबोधिनी समजून घेण्यासाठी शिवापूर उपकेंद्र भेट, पुणे केंद्र भेट, तर काहींची निगडी केंद्र भेट झाली. शिवाय या गटाने शाळा व गावपातळीवर किशोर–किशोरी मेळावे घेणे, युवतींचा कौशल्य वर्ग घेणे, कातकरी वस्त्यांवरील मुलांसाठी सत्र घेणे, कातकरी अभ्यासासाठी सर्वेक्षणाच्या प्रश्नावली भरून घेणे या प्रकारचे काम करण्याचा अनुभव घेतला. यातून प्रबोधिनीच्या कामाचा परिचय त्यांना झाला. काम करण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. प्रशिक्षणाचा समारोप पुण्यात मा. संचालकांच्या मार्गदर्शनाने झाला.

**अभ्यास दौरा :** वेल्ह्यातील युवतींचा महिनाभर कामाचा अनुभव घेऊन झाल्यावर पहिला कातकरी अभ्यास दौरा २४ व २५ मे रोजी कोकणात झाला. त्याला ९ युवती व ४ ताई गेल्या होत्या. वस्तीवर रहाणाऱ्या पार्वती मुकणे या कार्यकर्त्याही आल्या होत्या. कुडावळे येथे रहाणाऱ्या श्री. दिलीप–पौर्णिमा कुलकर्णी यांच्या घरी त्यांना गट भेटला. तर सृजन–त्यांचा मुलगा मत्स्यशेती करण्याच्या ठिकाणी गट प्रयोग बघायला गेला असताना भेटला. महाजनांचा पर्यावरणपूरक सोडा कारखाना पाहिला. हरणे येथील मत्स्यबाजार पाहिला. पुढे महाड जवळ खैरे–वलंग येथे श्रमजीवी जनता साहाय्यक मंडळ यांच्या सुरुवातीपासूनच्या कामाची मांडणी डॉ. गिरीश बडवे व अशोक आखाडे यांनी केली. मत्स्योत्पादनाचे प्रशिक्षण व कामाची माहिती विठ्ठल कोळेकर यांनी दिली. तसेच तेथील दोन कातकरी वस्त्यांना भेटी दिल्या. या संस्थेचे संस्थापक मा. डॉ. बाळासाहेब कोळेकर व त्यांच्या सहकाऱ्यांची भेट साताऱ्याला जाऊन घेतली. वेल्ह्यात अनुभव कथनानंतर त्यातील काहींनी विक्री करण्यासाठी येथे सुकट खरेदी केली.

वेल्हे तालुक्यातील ९ मुलींना महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती दिली. एकूण मिळून रु. ३५,०००/– ची आर्थिक मदत व महाविद्यालयात प्रवेश घेण्यासंबंधी कुठे प्रवेश घ्यावा इथ पासून अर्ज भरण्यापर्यंत मदत केली. अगदी महाविद्यालयात प्रवेशासाठी सोबत जाणे असेसुद्धा काहींसाठी करावे लागले.

## हिरकणी



माता पालिका प्रशिक्षणाचे म्हणजेच हिरकणी प्रकल्पाचे हे ६ वे वर्ष. यंदा प्रत्येक गावात ४ सत्रे, असे १० गावात झाले, यामध्ये १९० माता सहभागी होत्या. हिरकणी उपक्रमाची नवीन गावांना माहिती देण्यासाठी उपक्रम गावात सुरू होण्यापूर्वी नागपंचमी निमित्त लिंबारवाडी, रामवाडी, हिरपोडी या गावात मेळावे झाले. ८९ महिला सहभागी झाल्या.

यावर्षी नियमितपणे हे काम करणारा गट १८ जणींचा होता. गटाची मुक्कामी सहल अलिबाग येथे गेली होती. हिरकणी सत्र गाव पातळीवर घेणाऱ्या गटाची नियमित मासिक बैठक झाली, ज्यात कामाचे नियोजन व निवेदन तर झालेच; सोबतच प्रेरणा जागरण, प्रबोधिनी परिचय अशीही सत्रे घेतली. त्यामुळे यंदा आरोग्य सखी प्रकल्पातील गाववार जाणीव जागृतीची काही सत्रे या गटातील महिलांनी घेतली. कामाची प्रेरणा वाढत असताना आपण शिकले पाहिजे असेही वाटायला लागले. त्यामुळे गटातील ३ जणी पदवी शिक्षण घेत आहेत. त्यांच्यासोबत मुक्तविद्यापीठातून शिकणाऱ्या अशा अजून चार जणी आहेत.

## नवचैतन्य दल



नवचैतन्य दलः १५ गावातून प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या साधारण ३०० मुलांसाठी आपण दले घेतो. त्यात मुख्यतः मैदानी खेळ घेतले. याशिवाय राष्ट्रभक्ती शिकवणारी २ पद्येही शिकवली.

बालमेळावा : या दलावर येणाऱ्या ११० मुले/मुली यांचा व दल घेणाऱ्या १९ ताईंचा मेळावा घेतला. या मेळाव्यात मुलांचे खेळ घेण्यासाठी दीप्ती नामजोशी, स्वाती पेठे-बर्वे व स्मिता साठे आवर्जून आल्या होत्या. त्यांनी मुलांना विविध प्रकारचे खेळ आणि काही हस्तकौशल्ये शिकवली.

**स्पर्धेचे आयोजन:** जानेवारी-फेब्रुवारी महिन्यात वेल्हे/शिवापूर भागातील दलावर नियमित येणाऱ्या मुलांसाठी सूर्यनमस्कार स्पर्धेचे आयोजन केले होते. त्यात ५५ जणांनी भाग घेतला.

### खेळघर

यंदा खेळघर हा नवा उपक्रम जुलै २०१९ पासून ५ गावात सुरू झाला. इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या साधारण ६० ते ६५ मुलांचा सहभाग या खेळघरात असतो. या निमित्ताने ५ नवीन प्रशिक्षक नियमित कामाला जोडले गेले. या खेळघर प्रशिक्षकांची निगडी केंद्रातील खेळघर साहित्य-पाहणीसाठी सहल काढली होती. त्यासोबत निगडी गटासमोर ग्रामीण गटाचे अनुभवकथनही केले. यानंतर निगडीच्या १७ जणींच्या गटाने वेल्ह्याच्या कामाला भेट दिली.

## महिला विकास



### बचत गट

या प्रदेशात आपल्या मार्गदर्शनाने बचत गटाचे काम गेली २५ वर्षे चालू आहे. सध्या ५६ गावात २३६ गट चालू आहेत. ह्या गटांमध्ये दर महिन्याला ८,९७,२५०/- रु. बचत होत आहे. बचतीबरोबरच गटातून कर्ज घेणे, त्याचा घराच्या कामासाठी उपयोग करणे व परतफेड करणे, महिला आता शिकल्या आहेत. अनेक वर्षांच्या कामामुळे बचत गट हे ग्रामीण महिलेच्या विकासातील सहभागाचा 'एन्ट्री पॉइंट' बनला आहे. त्यातून आपण आरोग्याचे काम करतो, तर स्वयंरोजगार प्रशिक्षणाची माहिती देतो, कधी सहलीची योजना करतो तर कधी बँकेतून कर्ज मिळवून देतो. सगळ्या बचत गटाद्वारे वर्षभरात दिलेले कर्ज काही कोटी रुपयांचे असते.

★ **समूहगुण प्रशिक्षण** : स्त्री-शक्ती प्रबोधनाच्या ग्रामीण भागात संघटनेचे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे समूहगुण प्रशिक्षण झाले. हे प्रशिक्षण वेल्हे सहनिवासात मुक्कामी होते. त्यामध्ये २२ गावातून ३९ जणी सहभागी झाल्या होत्या. प्रबोधिनीचे संचालक मा. डॉ. गिरीशराव बापट व कार्यवाह मा. सुभाषराव देशपांडे यांनी गटाला अनुक्रमे 'संघटन मूल्ये' व 'भविष्यवेध' या विषयांवर मार्गदर्शन केले. गटागटात बसून स्वयंरोजगार, आरोग्य, नेतृत्व या विषयांच्या विभागातील चालू कामाची माहिती घेतली. कार्यक्रम शिस्तबद्ध करण्यासाठी आज्ञा कशा द्यायच्या यांचा सरावही गटाने केला. तर आलेल्या सगळ्यांनी कामाच्या अनुभवाचे कथन गटासमोर केले. प्रशिक्षणासाठी आलेला गट हा चाळीशीपेक्षा लहान होता. त्यामुळे येत्या दहा वर्षांत काय काम करावे, हे स्वप्न गटाने एकत्र पाहिले. त्यानिमित्ताने गट एकत्र बांधला गेला हे विशेष.



★ **एकल महिला** : या वर्षी नव्याने ९३ जणींचे वैयक्तिक माहितीचे फॉर्म भरून घेतले. आता एकूण ३७२ महिलांची माहिती जमा झाली आहे. त्यापैकी १५ जणींना व्यवसाय करण्यासाठी खेळत्या भांडवलाची व्यवस्था आपण केली. त्यातून त्यांनी घरात राहून करता येणारे व्यवसाय सुरू केले. १० महिलांना रोजचा स्वयंपाक लवकर व्हावा म्हणून मिक्सर वाटप केले. दूषित पाण्याने आरोग्याचे प्रश्न येऊ नयेत म्हणून फिल्टरचेही वाटप करण्यात आले. मिबा कंपनीने यासाठी मदत केली तर मिक्सरसाठी डॉ. प्राजक्ता दोशी यांनी मदत केली. या वर्षीच्या तिळगूळ मेळाव्यातच एकल महिलांच्या योजनांची माहिती

सांगितली. आता प्रत्येक बैठकीत या विषयावर केलेल्या कामाचे निवेदन होते. या निमित्ताने गावातल्या एकल महिलेला वेगळ्या प्रकारच्या मदतीची गरज असते असा विषय पोचला आहे.

| प्रशिक्षण | महिला | गावे |
|---|---|---|
| **शिवण** | : | |
| ब्लाउज | ७६ | १० |
| पिशव्या, मास्क इ. | ७७ | ७ |
| अन्य कौशल्ये (मणिकाम, क्रोशा, इ) | ९३ | ११ |
| खाद्यपदार्थ: चॉकलेट | ९५ | १२ |
| खाद्यपदार्थ: पापड | ३३ | २ |
| ग्रीटिंग्ज | ११ | २ |
| ब्युटीपार्लर | २३ | ७ |
| **एकूण** | **४०८** | **५१** |

**प्रशिक्षणे ४६ उलाढाल रु. २,८४,४००/-**

**स्वयंरोजगार प्रशिक्षण**

भातलावणी सहल : यावर्षी भातलावणीची सहल वेल्हे येथे आयोजित केले होती. प्रज्ञामित्र गटातील ६० जण व ज्ञान प्रबोधिनी प्रशाला नववीच्या स्त्री-शक्ती ग्रामीणच्या एस. पी. जी. गटातील विद्यार्थिनी व त्यांचे पालक असा १५ जणांचा गट, असे एकूण ७५ जण या सहलीसाठी आले होते. त्यांनी प्रथम शिवापूर येथील ज्ञान प्रबोधिनीच्या केंद्रास भेट देऊन तेथील महिलांचे काम कसे चालते, हे समजून घेतले. नाष्टा झाल्यावर कुसगाव खिंडीतून वेल्ह्याला सर्वजण पोहोचले. तेथील लोहारकाम पारंपरिक पद्धतीने कसे चालते, कोयता इत्यादी शेतीसाठी उपयोगी साधने कशी तयार केली जातात ते मुलांनी प्रत्यक्ष पाहिले. तेथून सर्वजण सुरेखाताई दिघे या प्रबोधिनीच्या कार्यकर्त्या आहेत त्यांच्या शेतावर पोचले. तेथे भाताची रोपे कशी तयार होतात, ही रोपे जमिनीत खोलवर कुठून कशी लावली जातात, दोन रोपांमध्ये किती अंतर ठेवायचं, एका रेषेत भातलावणी होण्यासाठी दोराचा उपयोग कसा करतात?, इत्यादी गोष्टी मुलांनी व पालकांनी प्रत्यक्ष करून बघितल्या. शेतात खूप दमून गेल्यानंतर मिळालेल्या जेवणाची चव काही न्यारीच होती आणि आता प्रत्येकाला पानातील अन्न तयार होण्यामागे लोकांनी घेतलेल्या कष्टाची जाणीवही होती. परतीच्या प्रवासात कुंभारकाम बघताना गणपती रंगविण्याची मजाही मुलांनी लुटली. एकदा तरी प्रत्येकाने ही भातलावणी अनुभवावी, अशी ही सहल ठरली.



**विशेष प्रशिक्षण:** क्विलिंग पेपर दिवे - नसरापूर केंद्रांतर्गत दिवाळीच्या निमित्ताने ७ गावांमध्ये ११ प्रशिक्षण-शिबिरं घेऊन क्विलिंग पेपरचे दिवे बनवायला शिकवले. या प्रशिक्षणात युवती व महिला मिळून १३८ जणींनी प्रशिक्षण घेतले. त्यांनी एक महिना कालावधीत २,१४३ दिवे बनवले. एकूण ६८,३४६/- रुपयांची उलाढाल केली, त्यासाठी ३५ जणींनी काम केले. प्रत्येकी रु. ५०००/- पेक्षा जास्त करणावळ मिळवणाऱ्या ६ जणी होत्या.

स्वयंरोजगार हा उपक्रम ग्रामीण महिलांसाठी गेली अनेक वर्षे राबवत आहोत. या उपक्रमांतर्गत शिवणकामाचे विविध प्रकार, ओरिगामी वस्तू बनविणे, मण्यांपासून विविध वस्तू बनविणे, चॉकलेट व केक बनविणे, क्रोशाच्या वस्तू बनविणे, क्विलिंग पेपरच्या वस्तू बनविणे इ. प्रशिक्षण घेतले.

**नेतृत्व विकसन**

गावपातळीवर महिला-नेतृत्वाचे काम मासिक बैठकीतून नियमित होते. सहली व मेळावे यातून आपण गाव नेतृत्वाची संधी देतो. यंदा नवरात्रात ५० गावात मेळावे घेतले. त्यात १,६२६ महिला सहभागी झाल्या. त्यातल्या पाककला स्पर्धेत २९१ महिलांनी भाग घेतला तर १२ गावात या निमित्ताने ३७० लोकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. मेळावे झाल्यानंतर ५५ जणींचा शोधबोध मेळावा झाला. त्यात सगळ्यांनी अनुभवकथन केले. तर संक्रांतीला १८ गावात तिळगुळाचे स्नेह मेळावे घेण्यात आले. यामध्ये ६७५ महिला सहभागी झाल्या व नेतृत्व बैठकीतील १७ जणींनी मेळावे घेण्याची संधी घेतली.

३ ते १२ जानेवारी २०२० मा कालावधीत सावित्री ते जिजाऊ जमंतीनिमित्त स्त्री शक्ती जागर केला. त्या निमित्ताने शिवापूर व आंबवणे येथे महिलांचे कार्यक्रम घेतले.

आरोग्य सखी हा सगळा प्रकल्प आरोग्याचा! त्यातही महिला आरोग्याचा म्हणजे पेशंट महिला आणि डॉक्टरही महिला. हे काम करताना असे सातत्याने लक्षात आले, की आरोग्यासंबंधी किमान जाणीव-जागृतीसाठी सुद्धा काम करायला हवे आहे. त्यासाठी यंदा स्थानिक कार्यकर्त्या महिलांची मोठीच फौज उभी केली. त्या गटातल्या सगळ्यांना जेव्हा प्रकल्पातील कार्यक्रमाबद्दल माहिती दिली, तेव्हा अनेकींनी त्यातले प्रत्येक सत्र आपल्या गावात घेण्यासाठी आग्रह धरला. सुरेखा धिंडले (धानेप), स्वाती वालगुडे (मार्गासनी), सोनल पवार (पाबे) यांचा विशेष उल्लेख करावासा वाटतो की या तरुण कार्यकर्त्यांनी काही तपासण्या त्यांच्या गावात पुन्हा-पुन्हा सुद्धा आयोजित केल्या व त्यात जास्तीत जास्त महिला सहभागी होतील, असे पाहिले.

## विविध प्रकल्प

### १. आरोग्य-सखी प्रकल्प :

आरोग्य सखी हा प्रकल्प वेल्हे तालुक्यातील ५० गावांसाठी जानेवारी २०१९ पासून सुरू झाला. गेली २५ वर्षे बचत गटाच्या माध्यमातून आपण वेल्हे तालुक्यातील खेडोपाडी पोचलो आहोत. गाव पातळीवर आरोग्याचे काम करणारी प्रबोधिका बहुतेक प्रत्येक गावात होती. बजाज कंपनीच्या आर्थिक मदतीमुळे कामाला जोर आला व परिणामकारक काम होऊ शकले. या प्रकल्पांतर्गत, वृत्त कालावधीत आपण ३५५ कार्यक्रमातून ८,२७१ जणांच्या आरोग्यापर्यंत पोचलो.

**जाणीव-जागृती सत्रे** : ७ विषयांची एकूण **१३८ सत्रे घेतली. यातून ३,३६१** लोकांपर्यंत हे विषय पोचवले.

हे विषय पोचवताना स्थानिक मनुष्यशक्ती या आरोग्य विषयात प्रशिक्षित होईल व स्थानिक तज्ज्ञता वाढेल असे पाहिले. या शिवाय या प्रकल्पात डॉक्टरांच्या मदतीने तपासणी शिबिरे घेतली. ६ प्रकारच्या **१११ तपासण्या खेड्यापाड्यांतील** २,८३४ महिला व मुलांच्या केल्या.

**जाणीव जागृती सत्रे**

| | | |
|---|---|---|
| १. ओळख स्पर्शाची | ४४६ विद्यार्थी, | २२ सत्र |
| २. सॅनिटरी पॅड वापराविषयी माहिती | ६१७ महिला, | ३१ सत्र |
| ३. स्त्री रोग | ३८९ महिला, | १९ सत्र |
| ४. जंत संसर्ग | ८९५ महिला, | १७ सत्र |
| ५. तंबाखू दुष्परिणाम | ७०१ महिला, | ३४ सत्र |
| ६. मानसिक आरोग्य | १११ महिला, | ५ सत्र |
| ७. सकस आहार | २०२ महिला, | १० सत्र |

**तपासणी शिबिरे**

| | महिला | सत्र |
|---|---|---|
| १. डोळे तपासणी | ४३१ | १२ |
| २. गरोदर माता तपासणी | ८५३ | २० |
| ३. गर्भाशय कॅन्सर तपासणी | २५३ | १६ |
| ४. हिमोग्लोबिन तपासणी | ८०७ | ४० |
| ५. दात तपासणी | २६४ | २० |
| ६. बाल आरोग्य तपासणी | २२६ | ३ |



**मानसिक तणाव**: वेल्हे तालुक्यातील महिलांसाठी मानसिक आरोग्य या नवीन विषयाच्या कामाला यंदा सुरुवात झाली. आतील दुर्गम खेड्यातील महिलांचा गट असल्याने महिला सुरुवातीला बोलक्या नव्हत्या, लाजत होत्या. त्यांना बोलतं करण्यासाठी सत्र घेणाऱ्या ताईंना खूप प्रयत्न करावे लागले. त्यानंतर काही महिलांनी त्यांना कोणत्या गोष्टींचा मानसिक ताण येतो याविषयी सांगितले. मानसिक आरोग्य म्हणजे काय, मानसिक आरोग्य बिघडवणारे घटक कोणते, मनाला बरं वाटत नसेल तर काय केले पाहिजे, मानसिक आरोग्य बिघडू नये यासाठी काय काळजी घेतली पाहिजे याविषयी महिलांना माहिती देण्यात आली.

आरोग्य सखी या प्रकल्पाअंतर्गत आपण गर्भाशय मुखाच्या कॅन्सरची तपासणी करतो. या तपासणीच्या वेळी आधी तक्ते दाखवून, माहिती सांगून आतून तपासणी केली जाते. या नाजूक विषयावर बोलायला व तपासणी करायला अनुभवाने आणि वयाने ज्येष्ठ अशा डॉ. शुभांगी कानिटकर येतात. त्या केळद गावात गेल्या असताना जवळपासच्या दुर्गम गावातल्या २४ जणी आल्या होत्या. माहिती ऐकल्यावर १७ जणींनी तपासणी केली आणि त्यापैकी १० जणींना पुढचे काही उपचार तातडीने करायला हवेत असे लक्षात आले. आपल्या कार्यकर्त्यांच्या मदतीमुळे अनेकजणी पुण्यात दीनानाथ हॉस्पिटल पर्यंत आल्या आणि त्यांच्यावर योग्य ते उपचार करण्यात आले. यात एकीला हार्निया झाला होता आणि उपचारा अभावी ती ५ वर्षे यातना सहन करत होती... आणखी गंभीर दुखणेही महिला दीर्घकाळ अंगावर काढत होत्या. केवळ महिला डॉक्टर असल्यामुळे मोकळेपणाने बोलून प्रकल्पाच्या आर्थिक मदतीने त्यांच्यावर उपचार होऊ शकले.

| क्र. | शाळा | गाव | क्षेत्र भेटीची ठिकाणे | सहभागी किशोरी |
|---|---|---|---|---|
| १. | तोरणा विद्यालय, | वेल्हे | दीनानाथ मंगेशकर रुग्णालय भेट व ज्ञान प्रबोधिनी पुणे भेट | २० |
| २. | तानाजी मालुसरे विद्यालय, | दापोडे | महर्षी कर्वे शिक्षण संस्था भेट | २२ |
| ३. | न्यू इंग्लिश स्कूल, | साखर | महर्षी कर्वे शिक्षण संस्था भेट | २० |
| ४. | राजा शिव छत्रपती विद्यालय, | सोंडे माथना | युद्ध स्मारक, MAERSK कंपनी भेट | १८ |



**महत्त्वाची नवीन भर** : मुलांचे लसीकरण– २६ फेब्रुवारी व १२ मार्च रोजी आरोग्य सखी प्रकल्पांतर्गत करंजावणे व वेल्हे येथील प्राथमिक आरोग्यकेंद्रामध्ये आपण २०० लहान मुलांना टायफॉईड व हिपेटायटिस याचे लसीकरण केले. या दोन्ही लसी सरकारी लसीकरणात समाविष्ट नाहीत व त्यांचा खर्चही बराच असल्याने ग्रामीण भागातील अनेक पालक या लसी आपल्या मुलांना स्वखर्चाने देऊ शकत नाहीत. प्रशालेच्या माजी विद्यार्थिनी डॉ. प्राजक्ता दोशी ह्यांनी याची जबाबदारी घेतली.

**किशोरी विकास उपक्रम** :

नियमित तासिका – ५ शाळांत वर्षभरात प्रत्येकी ९ जीवनकौशल्य व २ हस्तकौशल्याच्या तासिका झाल्या. जीवनकौशल्य – व्यक्तिमत्त्व विकसन प्रस्तावना, नाते शरीर मनाचे, शारीरिक व मानसिक स्वास्थ्य, आरोग्य –आहार व व्यायाम , शाळेत होणाऱ्या प्रतिज्ञेचा अर्थ, बौद्धिक विकसन, राष्ट्रसेवा इ. हस्तकौशल्य – राखी बनविणे, क्विलिंग, पणती बनविणे, स्वयंअध्ययन– उत्तरपत्रिका सजविणे इ. वरील ५ शाळांपैकी ४ शाळांत नियमित तासिका झाल्या. वाजेघर शाळेत कोणत्याही संस्थेस कामासाठी प्रवेश नसल्याने सप्टेंबर पर्यंत तीनच तासिका होऊ शकल्या.

**क्षेत्र भेट** – किशोरींना शिक्षणातल्या विविध संधी माहिती व्हाव्यात व चार भिंतींबाहेरचे जग पाहता यावं या दृष्टीने ४ शाळेतील एकूण ८० किशोरींच्या क्षेत्रभेटी योजण्यात आल्या.



**निवासी शिबिर** – दि. २८ –२९ डिसेंबर २०१९ रोजी किशोरींचे निवासी शिबिर झाले. हे शिबिर शिवापूर येथे राम–सीता पुराणिक महिला प्रशिक्षण केंद्र येथे झाले. शिबिरामध्ये चार शाळेतील ९७ किशोरी व सहनिवासातील ४ अशा मिळून एकूण १०१ मुली सहभागी झाल्या होत्या. या शिबिरात राष्ट्रसेवा, मानसिक व शारीरिक स्वास्थ्य यावर सत्र घेतले. याशिवाय गटकार्य, संध्याकाळी मैदानावर दल झाले, रोल प्ले केले. विविध विषयांवर गटचर्चा घेण्यात आली. शेवटी सर्व किशोरींनी मनोगत लिहून शिबिराचा समारोप झाला.

**सुट्टीतील गावपातळीवरील मेळावे** – एप्रिल व मे महिन्याच्या सुट्टीत तसेच दिवाळीच्या सुट्टीत गावपातळीवर मुला – मुलींचे दोन तासांचे मेळावे घेण्यात आले. या मेळाव्यांमध्ये नवनिर्मिती हा विषय सर्व वेल्हे तालुक्यातील जास्तीत जास्त मुला – मुलींपर्यंत पोचविणे असे नियोजन होते. यामध्ये जुन्या गोष्टींची सुरुवात बदला किंवा शेवट बदलून नवीन गोष्ट तयार करा, टाकाऊ वस्तूंपासून नवीन वस्तू तयार करा, कागदापासून विविध फुलं तयार करा असे विषय घेण्यात आले. त्याचबरोबर गाणी, बैठे खेळ व मैदानी खेळ खेळायला शिकविले. या मेळाव्यांमध्ये वेल्हे तालुक्यातील ५५ गावांतील १,४९५ मुला–मुलींनी सहभाग घेतला. हे मेळावे घेण्यासाठी वेल्हे भागातील १२ युवतींनी व ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील इ. ९ वीतील ५ मुलींनी काम केले. तसेच नवनगर विद्यालय, निगडी येथील अग्रणी मुला–मुलींनी गावपातळीवर जाऊन मेळावे घेतले.



**प्रशिक्षणे** :

याशिवाय ‘आशा’ आरोग्यसेविकांची ६ प्रशिक्षणे व अंगणवाडीताईंची ३ प्रशिक्षणे झाली.

१० सदस्यांचा एक गट जबाबदारी घेऊन या प्रकल्पाचे काम करत होता. या नवीन उत्साही गटामुळे काम वेगाने

पुढे सरकले. १२ मार्च २०२० रोजी आरोग्य सखी प्रकल्पाच्या कामाचे वर्षिक मूल्यमापन करण्यासाठी बजाज कंपनीच्या प्रतिनिधींनी भेट दिली. या भेटीतून आपण जे काम वर्षभर सातत्याने केले, त्याचे चांगले परिणाम दिसून आले. प्रकल्पाच्या सुरुवातीच्या काळात आरोग्य विषयक विविध तपासण्या करून घेण्यासाठी महिला फारशा तयार नसायच्या. अनेक गैरसमज व अंधश्रद्धा यामुळे वैद्यकीय तपासण्या करून घेण्यास त्यांची तयारी नव्हती. जाणीव–जागृतीच्या अनेक छोट्या बैठकी त्यांचे गैरसमज दूर करण्यासाठी घ्याव्या लागल्या. पण जसे–जसे प्रकल्पाचे काम पुढे सरकले, काही महिलांना या तपासण्याचा उपयोग झाला, त्यांच्यावर पुढे उपचार झाले, त्यांचा अनुभव पाहता हळूहळू इतर महिला तपासणी करून घेण्यास तयार झाल्या. आतातर अशा तपासणीची मागणी गावागावातून होऊ लागली आहे. वैद्यकीय उपचारांचे, आणि आजारी पडू नये यासाठी प्रतिबंधात्मक उपायांचे महत्त्व महिलांना वाटू लागले आहे... तरीही एकूण तालुक्याचा विचार करता पुष्कळ काम बाकी आहे.



२. **नवदिशा प्रकल्प**: जानेवारी २०२० ला प्रकल्पाची सुरूवात झाली. या प्रकल्पामध्ये गावपातळीवरील ५० गावांतील ५० महिला सहभागी आहेत. नवदिशा आणि नवचेतना बैठकीतील कार्यकर्त्या या प्रकल्पात आहेत. त्यांचे  नेतृत्व विकसन व्हावे व त्यांनी पुढे जाऊन गावातील महिलांसाठी काम करावे अशी कल्पना आहे. त्या प्रकल्पा अंतर्गत स्वतःचे बँकेत खाते काढणे, विमा काढणे  अशा आर्थिक उपक्रमांसोबत  सहल काढणे, गावात मेळावा असे उपक्रम योजले.

मा. वनिताताई पटवर्धन यांनी 'स्व–जाणीव' या विषयावर सत्र घेऊन उद्घाटन केले. गणपतीपुळे येथे अभ्यास सहल योजली. त्यात ५० पैकी ३८ जणी सहभागी झाल्या होत्या. त्याशिवाय आरोग्य विमा काढण्याचे काम करायचे ठरवले. स्वतः व मैत्रिणीचा असे ८५ जणींचे आरोग्य विमा काढून  पूर्ण झाले.

३. **टेलिमेडिसिन प्रकल्प** (साहाय्य : रोटरी क्लब ऑफ पुणे प्राईड) – वेल्हे तालुक्यातील करंजावणे प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत येणाऱ्या ११ 'आशा' कार्यकर्त्या यांच्या मदतीने टेलिमेडिसिन प्रकल्प चालू आहे. या अंतर्गत १,०७७ जणांची गावपातळीवर  आरोग्य तपासणी झाली. दरमहा आंबवणे कार्यालयात प्रशिक्षण झाले, निवेदन बैठक झाली. सह्याद्री हॉस्पिटल व करंजावणे प्राथमिक आरोग्य केंद्रासोबत टेलीमेडिसीनची ट्रायल झाली. या तपासण्यांना जोर यावा म्हणून १४० जणींचा मेळावा आडवलीच्या कार्यालयात घेतला. मेळाव्यात स्वयंरोजगाराची वेगवेगळी प्रशिक्षणेसुद्धा घेण्यात आली.



४. **कातकरी विकास प्रकल्प** : नियमित सत्रे : वेल्हे तालुक्यातील मालवलीच्या २ वस्त्यांवर २३ घरे मिळून ५ ते १५ या वयोगटातील ४४ मुलांसाठी तर चेलाडी व कासुर्डी या वस्तीवरील १०५  मुला–मुलींसाठी सत्रं घेतली. शारीरिक स्वच्छता व परिसर स्वच्छता यातून मुलांना नखे कापणे, दात घासणे, केस विंचरणे, हात–पाय धुणे याचे शिक्षण दिले. अभ्यासाची गोडी लागावी यासाठी इंग्रजी शब्द मोठ्याने म्हणणे, गणिती खेळ, बुद्धीला चालना देणारे मैदानी खेळ व त्यातून व्यायाम करणे असे उपक्रम केले. यातून असे लक्षात आले, की मुलांना लिहिता वाचता येत नाही. अशा प्रकारे चार वस्त्यांवर मिळून एकूण १२१  सत्रे झाली. नियमित सत्रांमुळे मुलांमध्ये नियमित दात घासणे, नखे स्वच्छ ठेवणे, आंघोळ करणे असे बदल दिसायला लागले आहेत.

मुलांसाठी पेशवे उद्यान व रेल्वे म्युझियम या २ ठिकाणी सहल झाली. २९ मुले–मुली व १० ताई असे एकूण ३९  जण सहभागी झाले. याशिवाय कुठल्या निवासात राहून पुढे शिकता येईल असे कामशेतचे वसतिगृहही गटाने पाहिले.



**प्रेरणा शिबिर** : कातकरी मुलांचे पहिले शिबिर ३४ मुलांचे २८ व २९ डिसेंबर रोजी वेल्हयामध्ये झाले. शिक्षणाची आवड निर्माण व्हावी तसेच स्वच्छतेचे महत्त्व समजावे म्हणून  'दप्तर' व 'स्वच्छता' अशा दोन

फिल्मस् पाहून त्यावर चर्चा झाली.

**कातकरी मेळावा**: वेल्ह्यात पहिला कातकरी मेळावा दि. २० जून २०१९ रोजी झाला. त्याला ३० महिला, २५ पुरुष व १६ मुले–मुली असे एकूण ९ गावांतील ७१ जण उपस्थित होते. मेळाव्याचा मुख्य उद्देश लोकांचे प्रश्न व अडचणी जाणून घेणे हा होता. प्रबोधिनीच्या द्वितीय प्रतिज्ञित कार्यकर्त्या कुंदाताई कचरे (रायदंडवाडी) यांचे अनुभवकथन झाले. जिद्द ठेवली तर गावासाठी जे हवे ते करता येईल असे मोठे उदाहरण पुढे होते. यानंतर वस्तीवरच्या प्रश्नांवर, अडचणींवर चर्चा झाली. मा. शुभांगीताई तांबट या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या होत्या.

५. **मराठी विकिपीडिया** : वृत्त कालावधीत ३० महिलांचे माहितीपर लेख लिहिले व लेखात भर घातली. यात यमुनाबाई सावरकर, निर्मला सीतारामन, अदिती पंत, कांचन परुळेकर, जानकी तेंडुलकर अशा महिलांचा समावेश आहे. गावांची माहिती पाबे, गेळगाणे, साखर, लव्ही खुर्द, वल्लभगड, रांजे, केळद, अशा आपल्या कार्यक्षेत्रातल्या २१ गावांच्या माहितीची भर घातली.

**विकिस्रोत पुस्तके**–प्रबोधिनीची खालील ६ पुस्तके विकिस्रोतवर सगळ्यांना वाचनासाठी खुली केली. 'बँकेत पाऊल टाकण्यापूर्वी',' बचत गटासाठी कार्यक्षम व्यवस्थापन प्रशिक्षण पुस्तिका', 'केल्याने होत आहे रे', 'आम्ही बी घडलो तुम्ही बी घडाना', 'महर्षी दयानंद काय म्हणाले?', 'रूप पालटू शिक्षणाचे'.

विकिमिडिया कॉमन्सवर काम करणाऱ्या महिलांचे व इतर असे साधारण ७० फोटो फोटोथॉन अभियानांतर्गत समाविष्ट केले.

६. **फिल्टर वाटप**: मिबा कंपनी सी.एस.आर : लोकांना स्वच्छ पाणी प्यायला मिळालं तर आजारापासून त्यांना दूर ठेवता येईल. या विचारातून लोकांना फिल्टर देण्याचे ठरवले. मिबा नावाच्या रांजणगाव येथील कंपनीच्या आर्थिक मदतीमुळे, आपण 'टाटा स्वच्छ' फिल्टरची खरेदी करून कुंबळे व कुसारपेठ या गावातील १००% कुटुंबांना आणि आंबवणे, अस्कवडी, विहीर, वडगाव झांजे गावातील निवडक घरांना, अंगणवाडीला व प्राथमिक शाळांनाही फिल्टर दिले. त्या निमित्ताने मिबा कंपनीचे अधिकारी कुंबळे गावात येऊन गेले.





७. **वॉटर फिल्टर शाळांना भेट** : रोटरी क्लब ऑफ गांधी भवन यांच्या आर्थिक मदतीने ११ ठिकाणी आर. ओ. वॉटर फिल्टर बसविण्यात आले. ज्या शाळांमध्ये पाण्याच्या टाकीची सोय नाही अशा ५ शाळांमध्ये फिल्टरसह १००० लिटरची पाण्याची टाकीसुद्धा देण्यात आली. हा पूर्ण संच साधारण सव्वा लाख रुपये खर्चाचा आहे.

फिल्टर दिले अशा शाळा – १) तोरणा विद्यालय, वेल्हे येथे –३ फिल्टर (विद्यार्थी संख्ये नुसार) २) साखर जिल्हा परिषद शाळा व माध्यमिक शाळा (new english school) – २ फिल्टर ३) अस्कवडी जिल्हा परिषद शाळा – १ फिल्टर ४) चिरमोडी जिल्हा परिषद शाळा १ फिल्टर ५) वडगाव झांजे जिल्हा परिषद शाळा – १ फिल्टर ६) मंजाई आसनी माध्यमिक विद्यालय १ फिल्टर ७) सोंडे माथना माध्यमिक विद्यालय १ फिल्टर ८) वेल्हे सहनिवास – १ फिल्टर; असे ११ फिल्टर बसविण्यात आले.

८. **डेली कलेक्शन** : जिजामाता प्रबोधन केंद्राच्या बचत गटा सोबत खेळत्या भांडवलाचा एक प्रकल्प केला. ज्यांच्या उद्योगात रोज भांडवल घालून मोकळे होते म्हणजे हॉटेल, पीठ गिरणी, शिवण अशांना या प्रकल्पातून केंद्र भांडवल पुरवते. त्याची परतफेड रोज १०० रुपया प्रमाणे करावी, अशी कल्पना बचत गटातल्या धडपड्या महिलांसमोर मांडली. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला, आज पर्यंत ३० महिलांना असे २० ते ४० हजार रुपयांचे भांडवल पुरवले गेले. पैसे फिरल्यामुळे वर्षभरात रु.२,४०,०००/– कर्ज दिले गेले. त्यातून कोणाचे व्यवसाय नव्याने तर सुरू झाले, कोणाचे होते ते मोठे झाले. काही जणींनी प्रथमच प्रासंगिक उद्योग करून या कर्जाची फेड केली. यामुळे कुटुंबालाही कमाईचा हातभार लागलाच! कुटुंबातल्या महिलेचा सन्मानही वाढला. कर्जमाफीच्या जमान्यात स्वतःच्या कष्टाने उद्योग उभा करून भांडवलाची चोख परतफेड करणारी महिला उभी करणं हेच तर आपलं प्रबोधनाचं काम!

आजपर्यंत यशवंतराव मुक्त विद्यापीठाच्या १२वी समकक्ष परीक्षेत १८३ जणी उत्तीर्ण झाल्या. नव्याने ५ जणी परीक्षा देऊन उत्तीर्ण झाल्या. १३ जणी पुढील शिक्षण घेत आहेत.

**९. राम–सीता पुराणिक तंत्र निकेतन** : जानेवारी – डिसेंबर २०१९ या काळात शिवण, चॉकलेट, केक, मणीकाम, क्विलिंग अशा प्रशिक्षणाचे एकूण ३५ वर्ग झाले. त्यात कुसगाव, रांजे, कल्याण, आर्वी, कोंढणपूर, श्रीरामनगर, ससेवाडी, गाऊडदरा, खोपी, शिवरे, केळावडे या गावांतून मिळून १८३ जणी प्रशिक्षित झाल्या. या प्रयत्नांमुळे २३ जणी नियमित उत्पादन कामामध्ये सहभागी झाल्या. तंत्रनिकेतनात आलेल्या महिलांनी रु. ५५,७००/– रकमेचे शिवणासंबंधी उत्पादन केले, त्यातून रु. २०,०६५/– रकमेची करणावळ मिळवली.



**१०. ज्येष्ठ नागरिक** : या वर्षी नव्याने ज्येष्ठ नागरिक सेवा–कार्य अशा विषयावर कामाला सुरुवात केली. या वर्षी घिसर व विहीर या २ गावात दीड महिना प्रत्येकी १०–१२ ज्येष्ठ नागरिकांची भोजनाची व्यवस्था केली. जे ज्येष्ठ एकटे गावाकडे रहात आहेत त्यांनी एकत्र जेवण करावे व त्यांना सकस आहार मिळावा असा त्याचा हेतू होता. एकत्र स्वयंपाक केल्याने श्रम वाचतील असेही होते. त्या निमित्ताने गावातल्या एकीला रोजगारही मिळाला. या निमित्ताने ज्येष्ठ नागरिकांच्या स्थितीचा अभ्यासही झाला.





**११.बालवाडी :** १९–२० या वर्षात आपण ७ बालवाड्या चालवल्या. यामुळे ८० मुले–मुली शिक्षण प्रवाहात आले. या बालवाड्यांमध्ये मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी हसत खेळत बाल शिक्षण दिले जाते. दरमहा बालवाडी घेणाऱ्या स्थानिक शिक्षिकांना प्रशिक्षणही दिले जाते. मुलांसाठी विशेष उपक्रम म्हणून यंदा सर्व मुलांना वेल्ह्यात एकत्र आणले होते. सगळ्यांनी पोलीस स्टेशनाला भेट दिली व पोलीसमामांशी गप्पा झाल्या. वर्षभरात ५ बालवाड्यांना लहान मुलांच्या डॉक्टरांनी भेट दिली व तपासणी केली. त्यावेळी माता पालिकांनाही डॉक्टरांनी मार्गदर्शन केले.

कामावरचा अभ्यास

★ **'ग्रामीण महिलेची आर्थिक साक्षरता बचत गट उपक्रमामुळे वाढली का, त्याचा चिकित्सक अभ्यास'** या विषयावर पुणे विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र आंतर विद्याशाखीय विद्यानिष्णात (एम. फिल.) पदवीसाठी सुवर्णा गोखले यांनी डॉ. बामणे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन केले. यासाठी आपल्या कार्यक्षेत्रातील एकाच बँकेशी जोडलेल्या खोपी व निधान गावामधल्या बचत गटातील ७१ सभासद महिलांचा अभ्यास केला. यामधले निधान गाव हे सर्वसाधारण गाव होते तर खोपी हे आर्थिक समावेशित गाव होते, म्हणजे या गावातील प्रत्येक घरातल्या कोणाचे तरी बँकेत खाते आहे असे गाव होते.

या अभ्यासात या दोन गावांमधल्या बचत गट प्रमुख व सभासद यांच्या आर्थिक साक्षरतेची तुलना केली. यामध्ये रिजर्व्ह बँकेने सांगितलेल्या पायऱ्यांनुसार आर्थिक साक्षरता किती आहे, याची ३१ घटकांवर तुलना केली. त्यात एकट्या महिलेच्या नावाने बँकेत बचत खाते असणे, बचत वेगवेगळ्या ठिकाणी असणे, पॅन असणे, एटीएम असणे–वापरणे, कर्ज घेणे, बँक व्यवहार करणे, भविष्याची आर्थिक तरतूद करणे, इन्शुरन्स काढणे आणि आर्थिक निर्णय घेणे असे घटक होते. त्यात असे आढळले की –

१. आर्थिक साक्षर खोपी गावात सगळ्यांची सरासरी आर्थिक साक्षरता निधान गावाच्या तुलनेत जास्त आहे.

२. दोन्ही गट प्रमुखांची आर्थिक साक्षरता सभासदांपेक्षा जास्त आहे. याची चर्चा करताना महिलांची व्यवहाराची भीड चेपली.

३. आर्थिक साक्षर झाल्यामुळे व्यवसाय संधी मिळाली, व्यवहार करता यायला लागल्यामुळे बाईपणाचे ओझे हलके झाले.

या अभ्यासातून असे म्हणता येईल, की ग्रामीण महिलेची आर्थिक साक्षरता बचत गट उपक्रमातील सहभागामुळे निश्चितच वाढली आहे.

★ **'बचत गटातील सहभागातून ग्रामीण महिलांची निर्णय शक्ती कशी वाढीस लागते'** हा विषय अभ्यासासाठी घेऊन वंदनाताई कामठे यांनी एम.फिल चा अभ्यास कर्वे समाज सेवा संस्थेमधून प्रा. अंजली मायदेव यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करून त्याचा अहवाल सदर केला आहे.

विचारांमध्ये परिवर्तन, त्यातून ग्रामीण महिलांच्या निर्णय क्षमतेमध्ये बदल घडून यायचे असतील तर त्यासाठी दीर्घ काळ बचत गटाच्या माध्यमातून काम केलेले असले पाहिजे हे लक्षात घेऊन गाऊडदरा, खोपी, शिवरे या गावांतील १०० महिलांचे सर्वेक्षण करण्यात आले. बहुतेक जणी या १० वर्षांपेक्षा जास्त काळ बचत गटाच्या सदस्या आहेत. ४० प्रश्नांची एक प्रश्नावली तयार केली होती. ज्यामध्ये या ग्रामीण महिला त्यांच्या वैयक्तिक बाबतीत, कौटुंबिक बाबतीत तसेच गावाच्या पातळीवर निर्णय प्रक्रियेत कशा सहभागी होतात याविषयी विचारले होते. म्हणजे हे निर्णय त्या एकट्या घेतात, ती स्त्री व तिचा पती असे दोघे मिळून घेतात आणि तिच्या घरातील सर्व कुटुंबीय मिळून निर्णय घेतात का, असे विचारले होते. या स्त्रिया बचत गटामध्ये येण्यापूर्वी हे सर्व निर्णय कशा प्रकारे घेत होत्या व बचत गटात आल्यानंतर तेच निर्णय घेण्याच्या पद्धतीत काही बदल झाले का, याचा तुलनात्मक अभ्यास करून अभ्यासाचे निष्कर्ष काढण्यात आले. ते पुढीलप्रमाणे–

१. बहुतांश अभ्यासात सहभागी महिला वैयक्तिक बाबतीतले तसेच कुटुंब पातळीवर मुलांच्या शिक्षणासंदर्भात निर्णय आता स्वतःचे स्वतः घेताना दिसतात.

२. महिलांना निर्णयक्षम बनवण्यामध्ये बचत गटातील आर्थिक उलाढाली बरोबरच इतर जे कार्यक्रम होतात –जसे की सहली, गावपातळीवर होणारे मेळावे, अभ्यासदौरे यांचा महत्त्वाचा वाटा आहे.

३. या अभ्यासात आढळून आले, की कुटुंबाच्या आर्थिक निर्णयांमध्ये तसेच गावातील निर्णय–प्रक्रियेमध्ये महिला अजून लक्षणीयरीत्या सहभागी होत नाहीत. हा टप्पा गाठण्यासाठी अजून बराच कालावधी लागेल.

समाजजीवनात होणारे बदल हे किती धीम्या गतीने होत असतात, याचे प्रत्यंतर हा अभ्यास करताना आले.

★ **ग्रॅज्युएट वुमेन इंटरनॅशनल** : ग्रॅज्युएट वुमेन इंटरनॅशनल या संस्थेने जुलै २०१९ मध्ये जागतिक परिषद आयोजित केली होती. या परिषदेत 'शिक्षणासाठी वातावरण निर्मिती केली तर मुली शिकत राहतात व महिला पुन्हा शिकायला लागतात' असा आपल्या कामावरचा एक निबंध सुवर्णा गोखले यांनी जिनिव्हा, स्वित्झर्लंड येथे जाऊन वाचला. त्यात आपल्या निवासातील मुली– ज्यांचे पालक कमी शिकले आहेत, त्यांना निवासातील वातावरणाचा शिक्षणाची प्रेरणा वाढायला कसा उपयोग झाला, हे मांडले तर दुसऱ्या भागात ज्या महिलांचे लहानपणी काही कारणाने शिक्षण सुटले त्या महिला जेव्हा मुलंबाळं मोठ्ठी झाल्यावर वातावरण निर्मितीमुळे पुन्हा औपचारिक शिक्षणप्रवाहात येऊन शिकू लागल्या तेव्हा त्यांचा आत्मविश्वास कसा वाढला, याचा अभ्यास मांडला.

## विशेष लेख

### १. आरोग्य फेरी

### ८ मार्च २०२०, जागतिक महिला दिन

स्त्री–शक्ती प्रबोधन (ग्रामीण) कामाच्या रौप्यमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने, जागतिक महिलादिनाचे औचित्य साधून किशोरी, युवती व महिला यांची आरोग्य फेरी वेल्हे या तालुक्याच्या ठिकाणी आयोजित केली होती. रविवार दि. ८ मार्च २०२० रोजी विंझर गावापासून वेल्हे गावापर्यंत असे १० कि. मी. अंतर पार करणे अशी योजना होती. या आवाहनाला प्रतिसाद देऊन १२० किशोरी , ८६ युवती , ६२० ग्रामीण महिला अशा ६६ गावांमधून आल्या होत्या. त्याशिवाय प्रबोधिनीच्या निगडी क्रीडाकुलच्या मुली व ताई मिळून १९ जणी सहभागी होत्या. पुण्यातून प्रबोधिनीच्याच वेगवेगळ्या विभागातील सदस्य व काही संस्थाप्रतिनिधी अशा ४५ जणीसुद्धा आरोग्य फेरी मध्ये सहभागी झाल्या होत्या. अशा सर्व मिळून ८९० जणींचा सहभाग होता. सगळ्यात लहान अवघी ६ वर्षाची बाल–किशोरी होती

**एक नवा पायंडा!**

आरोग्य सखी प्रकल्पांतर्गत आपण काहीजणांची हिमोग्लोबिन तपासणी करणे अपेक्षित होते, पण पुरेशी संख्या जमत नव्हती. कारण लोकं लग्नकार्यात गुंतले होते. मग आपल्या सुरेखा ताईच्या मुलीच्या लग्नातच आपण तपासणी करायची तयारी केली. टॅब वापरणाऱ्या ४ जणींनी मांडवातच टेबल टाकले व ४ तासात ८६ जणांची रक्त तपासणी केली. लग्नकार्यात एक नवा पायंडा पाडला म्हणून आपल्या कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला व वऱ्हाडाने त्याची चांगली दाखल घेतली. एकाने तर 'आमच्याही लग्नात या' असे आमंत्रणही दिले!

तर ७२ वर्षाची ग्रामीण महिला नि ७४ वर्षे वयाच्या पुण्यातील सर्वात मोठ्या युवतीं! चा सहभाग या दौडीमध्ये होता हे विशेष!

ठीक ८ वाजता सगळ्यांनी विंझर कॉलेजच्या ग्राऊंडवर जमायचे होते. पहिला गट ७ वाजता पोचला. तोवर चहावाल्याने २०० कप चहा गॅसवर ठेवलासुद्धा होता. मग वेल्ह्याचे नावनोंदणी करणारे गट आले आणि म्हणता–म्हणता गावोगावच्या २५–३० गाड्यांतून भराभर महिला–मुली उतरल्या. गटागटात नाव नोंदणी झाली. पाण्याची गाडी आली. पळायच्या वाटेतल्या हॉटेलमध्ये त्यांनी पाणी उतरवले सोबत एक स्वयंसेविकाही होती. प्लॅस्टिकचा वापर टाळून आवश्यक तिथे कागदी ग्लास होते. एकीकडे सगळ्यांचा चहा झाला. चहासोबत प्रत्येकीला बिस्कीटपुडा दिला होता. ग्रामीण बायकाच त्या! भल्या पहाटे उठून घरच्यांच्या पोटाची सोय करून आल्या, पण स्वतः उपाशीच आल्या असणार हे माहिती होतेच... तसेच होते. मग अश्विनीताई यांनी शिट्टी वाजवली आणि सगळ्यांना रांगेत उभे केले. आधी किशोरींचा गट त्या नंतर युवतींचा गट. हे गट पूर्ण १० किमी. पळणारे होते. मग महिला. त्यात पुण्याच्या नि गावाकडच्या होत्या, गणवेशात असणाऱ्या 'आरोग्य आशा' कार्यकर्त्यांची वेगळी रांग होती तर 'हिरकणी' प्रकल्पाच्या सगळ्या गणवेशाच्या जाकिटात हजर होत्या. नवदिशा, नवचेतना बैठकीतल्या प्रतिनिधी आपापल्या गावातल्या गटांसह मैदानात उतरल्या होत्या.

डॉ. वैशालीताई बिनीवाले गेली १४ वर्षं गरोदर महिलांच्या आरोग्य तपासणीसाठी वेल्हे तालुक्यात येत आहेत. त्यांनी सगळ्यांना शुभेच्छा दिल्या, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एडके सरांनी शुभेच्छा दिल्या, करंजावणे प्राथमिक केंद्राचे डॉ नांदेडकर स्वतः उपस्थित होतेच, शेवटी पोलीस अधीक्षक देवकर सरांनी सर्व सहभागींना महिला दिनाच्या शुभेच्छा व प्रोत्साहन दिले. सगळ्या जणी आरोग्य दौडीसाठीच आल्यामुळे कुठेही खुर्च्यांची सोय केली नव्हती आणि कोणाचीही त्या बद्दल तक्रार नव्हती. उत्साह ओसंडून वहात होता! पळायला लहान मुलींइतक्याच मोठ्ठ्याही उत्सुक होत्या. यासाठी कोणीही सराव केला नव्हता. सगळ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता. सोहळा बघायला वेल्ह्यातील सामाजिक कार्यकर्त्या जाधवबाई स्वतः आल्या होत्या. डॉ. वैशालीताई यांनी हिरवा झेंडा दाखवला आणि एक–एक गट पळायलाच लागला. जिला दमल्या सारखं झालं ती थोडा दम खाऊन थोडं चालून पुन्हा पळायला लागायची. अशाही खूप होत्या. ही काही बक्षिस पटकवण्यासाठी जिवाचं रान करून पळायची स्पर्धा नव्हती तर गटानं एकत्र येऊन स्वतःच्या आनंदासाठीची केलेली योजना होती. सत्तरी ओलांडणाऱ्या सगळ्या जणींनी ५ किमी. अंतर चालणे केले तर ४५० पेक्षा जास्त जणींनी १०किमी. अंतर चालत किंवा पळत हसत–हसत ओलांडले. अशा भारावलेल्या, चैतन्यमय वातावरणात ग्रामीण महिला आयुष्यात प्रथमच पळत होत्या. या आरोग्य दौडीचा एक भाग असा होता, की 'डॉक्टरांच्या सोबत चालणे' यासाठी पुण्यातून पाच निमंत्रित होते. सर्व महिला डॉक्टर गटासोबत १० किमी. चालल्या हे विशेष! एवढंच काय पण प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉक्टरही ५ कि.मी. चालले. या वेळी पोलिसांचे सहकार्य उल्लेखनीय होते. महिला पोलिसही टप्प्याटप्प्यात गटासोबत चालत होत्या. एकूणच पोलीस व शासकीय आरोग्य खाते अगदी स्वतः डॉक्टरांपासून आशा सेविकांपर्यंत सगळे सोबत चालत होते. या उत्स्फूर्त सहभागामुळे संयोजकांना अतिशय सुरक्षित वाटत होतं. नऊवारी पेहेरावातल्या ५० पेक्षा जास्त महिला सहभागी झाल्या होत्या आणि या सर्व जणींनी १० किमी. अंतर पूर्ण केले. गावाकडच्या अनेक जणी सवयीने अनवाणी पळत होत्या.

सहभागींपैकी मावळातले सगळ्यात लांबचे गाव म्हणजे लिंगाण्या जवळचे सिंगापूर (वेल्ह्यापासून ३२ कि.मी.) तर सिंहगड पिछाडीचे कल्याण (वेल्ह्यापासून ४८ कि.मी.). या भागातल्या ६६ गावांतून गट सहभागी झाले होते. वेल्ह्याच्या सहनिवासातल्या आपल्या मुलींच्या पालिकांना मुद्दाम निमंत्रण दिले होते. त्या आल्या होत्या आणि विशेष म्हणजे १७ आईपालक आपापल्या मुलीसोबत सहभागी होऊन दौडीमध्ये पळाल्यासुध्दा!

चालत–पळत सगळे गट अखेर वेल्ह्याच्या एस. टी. स्टँडवर पोचले आणि मग तिथून सगळा एकत्र गट घोषणा देत शिवगोरक्ष कार्यालयात गेला आणि विसावला! तोवर सगळ्या गाड्याही पोचल्या. ड्रायव्हर सांगत होते, 'दमलेल्यांना सांगत होतो गाडीत बसा, तर बाया ऐकतच नव्हत्या! ती बघ माझ्या पुढे आहे; थांब तिला गाठते म्हणून पळत होत्या.'.... नऊवारीवाल्या सुद्धा मागे नव्हत्या!

१०.३० पर्यंत शेवटचा गटसुद्धा पोचला! हुश्श! मग कार्यालयात सभा झाली. ग्रामीण स्त्री शक्तीच्या कामाचा धावता आढावा घेतला. डॉक्टरांचे सत्कार केले, या दौडीच्या संयोजकांपैकी एक रोटरी क्लब ऑफ पुणे प्राईड होते. त्यांचे १० प्रतिनिधी वेल्ह्यात सहभागी व्हायला आले होते. त्या प्रतिनिधींचा सत्कार केला. पाहुण्यांची मनोगते, मार्गदर्शन झाले आणि शेवटी चालणाऱ्या/ पळणाऱ्या वेगवेगळ्या गटांमधल्या पहिल्या ३ जणींचे कौतुक म्हणून स्मृतीचिन्ह देउन सत्कार केला. त्यात किशोरी, युवती गट होते; महिला ५ कि.मी., १० कि.मी. असेही गट होते आणि विशेष म्हणून पुण्याच्या गटाचे वेगळे नंबर काढले होते आणि नऊवारी गटामध्येही वेगळे नंबर काढले होते. बहुतेक स्थानिक बक्षिसे ही नेहेमी गरज म्हणून चालावे लागते अशा गेळगणे व रायदंडवाडी इथल्या धनगरगटानेच पटकावली. फारशा कुठल्या कार्यक्रमात एरवीही सहभागी होत नसणाऱ्या

या महिलांना तर बक्षिसासाठी सुद्धा पुढे यायचा संकोच होत होता. अशांचा सहभाग या दौडीमध्ये होता, दिवस कारणी लागला! शेवटी प्रार्थना होऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रम संपताच सर्व गटांचे प्रमुख वाढपी बनले आणि तासाभरात भुकेलेल्या ९०० जणींची जेवणे पार पडली. भूक इतकी लागली होती की पंगतीत शेवटी वाढेपर्यंत पहिलीचे जेवण करून होत होते. जेवताना सगळ्या मिळून-मिसळून बसल्या होत्या. 'मी एक-दोन किलोमीटर चालायचे ठरवले होते पण दहा किलोमीटर कधी झाले कळलेच नाही,' अशा गप्पांना रंग चढला होता. ज्या आल्या नाहीत त्या केवढ्या आनंदाला मुकल्या, अशीही चर्चा होत होती.

गावागावात रहाणाऱ्या ८० गाव-प्रतिनिधींच्या गटाने फक्त पंधरा दिवस काम करून केवळ महिला सहभागी असणारी अशी पहिली आरोग्य दौड अशा प्रकारे यशस्वीरीत्या पूर्ण केली.

यासाठी अनेकांनी मदत केली. पुण्याहून जाण्या-येण्यासाठी गिरिकंद ट्रॅव्हल्स व जुनावणे ट्रॅव्हल्स यांनी बस उपलब्ध करून दिल्या तर वेल्ह्याचे कार्यालय भुरूक कुटुंबीयांनी अल्प मोबदल्यात उपलब्ध करून दिले. रोटरी क्लबने टेलिमेडिसिन प्रकल्पांतर्गत भरीव अर्थसाहाय्य दिले तर औंध व पौडरोड संवादिनी गटाने स्मृतीचिन्हासाठी अर्थसाहाय्य दिले. कातकरी गटासाठी त्यांच्यासाठी चालू प्रकल्पातून आर्थिक मदत झाली तर आरोग्य सखी प्रकल्पाचे अर्थबळ काही दुर्गम गावांसाठी उपलब्ध झाले. याशिवाय काही वैयक्तिक देणगीदारांनी यासाठी देणगी दिली. सर्व डॉक्टरांनी सहभागी होण्याचे सहज मान्य केले आणि गावागावातल्या प्रतिनिधींनी आपापल्या गावातून प्रयत्नपूर्वक सहभागी गट उभा केला .... अशा सगळ्यांच्या नेमक्या प्रयत्नामुळे आणि सहभागाने हा कार्यक्रम अविस्मरणीय तर झालाच पण सगळ्याच गटाला नवीन ऊर्जा देणारा ठरला.

सहभागी गटातल्यांच्या काही प्रतिक्रिया!

★ सर्व प्रबोधिका आणि ताईंचे अप्रतिम नियोजन. आजचा कार्यक्रम खूपच छान झाला. माझा पहिला-वहिला कार्यक्रम होता, कायम स्मरणात राहील.

★ Lucky to witness such an awesome gathering!

★ अतिशय सुनियोजित , संस्मरणीय कार्यक्रम झाला. खूप मजा आली.

★ नियोजनबद्ध कार्यक्रम, सर्व व्यवस्था पण उत्तम!

★ खूपच छान नियोजन. कायम स्मरणात राहील...

★ महिलादिनानिमित्त शिवभूमीत माता जिजाऊंच्या छायेत पुण्यशील तोरण्याच्या पायथ्याशी शिवपुत्रींचा आनंद मेळावा साजरा झाला. 'कोणती पुण्ये अशी येती फळाला', वाटते आयुष्याचे चंदन झाले.

★ कार्यक्रम उत्तम झाला, सर्व व्यवस्था, सहभागींचा उत्साह ऊर्जादायक आहे. किशोरींची संख्या आणि सहभाग भविष्यासाठी विशेष आश्वासक आहे.

★ इतका अनोखा आणि ऊर्जा देणारा महिलादिन झाला की तो आज तिथे येणाऱ्या प्रत्येक महिलेला स्वतःची अशी ओळख देऊन गेला, फारच छान!

★ कार्यक्रमाचे नियोजन १ नं. होते. सगळ्यांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. It was completely charged atmosphere. Hats off to you आज मी खूप अनमोल खजिना घेऊन घरी आले!

## २. २५ वर्षं पूर्ण!

आशा सुर्वे

बचत गटाच्या उपक्रमाला २५ वर्षं पूर्ण झाली. सुरुवात केली तेव्हा बचतीचे महत्त्व पटवून द्यावे लागत होते. बचत कशी करायची हे सुद्धा सांगितले जायचे. बचत केली की अडीनडीला कर्ज मिळते हे कळल्यामुळे ग्रामीण महिला बचत करायला शिकल्या. त्यामुळे बचतीची सवय लागली. या कामाची घडी बसायला १० वर्षं लागली. सुरुवातीला बचतसुद्धा महिन्याला २०-२५ रुपये असायची. अगदी २० रुपये दरमहा बचत करणारीला ५ वर्षांनी एक रकमी व्याज धरून २००० रुपयांपेक्षा जास्त रक्कम मिळायची. एवढी मोठी रक्कम त्यांनी कधीही पाहिलेली नसायची. त्यामुळे अनेकदा मोजताही येत नसे. यामुळे बचतीसाठी पैसे मिळवण्याचा महिलांचा प्रयत्न सुरू झाला. कोणी शेतात कामाला जाऊ लागले तर कोणी पिकवलेले धान्य विकण्याचा प्रयत्न करू लागले. याचा फायदा बघून बचत गटाची संख्या वाढायला लागली... गावांची संख्याही वाढायला लागली.

आपण केलेली बचत आपल्यालाच वापरायला मिळते, त्यातून आपलीच कामे होतात, बचत गावातच फिरते. त्यामुळे अनेकांच्या गरजा भागतात, हे सगळ्यांना कळू लागले. सुरुवातीला गटात फक्त बचतच खेळती रहायची, पण मग

गरजा वाढल्यामुळे बचतही वाढायला लागली. सुरुवातीला २० रुपये बचत करणारे गट आता सरासरी ५०, १००, २०० रुपये बचत करणारे व्हायला लागले.

अशी बचत वाढली तरी कर्ज मागणी पुरी होत नव्हती. मग आपण बँकेशी गटांची जोडणी केली. त्यावेळी गावातल्या सगळ्या गटांनी एकत्र बसावे म्हणून विभाग प्रक्रिया सुरू केली होती. या सगळ्यातून मोठी उलाढाल करायला महिला शिकल्या होत्या. हातात पैसे आल्यामुळे कोणी म्हैस घेत होते तर कोणी शिलाई मशीन, कोणी मसाला कांडप करायला डंक घेत होते तर कोणी शेतात भांडवल गुंतवत होते. हे एकमेकींचे बघून करावेसे वाटत होते. त्यातून घराची उत्पादकता वाढत होती. त्याशिवाय मुला-मुलींच्या शिक्षणासाठी घेतलेले कर्जही महत्त्वाचे आहे.

या टप्प्याला स्वयंरोजगाराच्या कामाला सुरुवात झाली. या कामाचा भाग म्हणून असे करू शकणाऱ्या महिलांना शोधून त्यांचे प्रशिक्षण करून त्यांनी व्यवसाय करावा, असे वातावरण तयार करत होतो. या प्रयत्नामुळे आपण काम केलेल्या गावात अशा अनेक जणी दिसतील, की ज्या स्वतःच्या पायावर उभ्या आहेत. आता या उपक्रमात ५००० पेक्षा जास्त महिला सहभागी आहेत.

अशा बचत गटाच्या कामामुळे जाग्या झालेल्या महिला त्यांच्या मुलींचे शिक्षण झाले पाहिजे असा आग्रह धरताना दिसत आहेत. जिथे परवडत नव्हते तिथे संस्थेतून स्कॉलरशिप घेऊन शिकत आहेत, कोणाला शाळेत जायची अडचण असेल तर सायकल मिळवून देऊ पण मुलीला शिकवूच, असा आग्रह आता गट करू लागला होता.

बचत गटाच्या कामामुळे महिलेने स्वतःच्या पायावर उभे रहायला हवे, कुठलेही संकट आले तरी खचून जाता कामा नये म्हणून गटाचे संघटन पाठीशी होते. महिलांमध्येही जिची परिस्थिती बिकट आहे, जी महिला दुर्लक्षित आहे अशी महिला म्हणजे एकल महिला... अनेकदा तिला एकल असण्याची अपराधी भावना मनात येत असे. अशा महिलांचे मेळावे घेऊन त्यांच्या अडचणी समजून घेऊन अडचणी सोडवण्याचा प्रयत्न करू लागलो. त्यातल्या काहींना शासकीय योजनेचे फायदे मिळवून दिले. या आधारामुळे कधीही घराबाहेर न पडणाऱ्या महिला आधार मिळाल्यामुळे आता घराबाहेर पडू लागल्या.

या महिलांनी एकत्र येऊन ज्ञान प्रबोधिनीच्या मार्गदर्शनाने जिजामाता प्रबोधन केंद्र या नावाने न्यास स्थापन केला आहे. बचत गटापासून सुरू झालेला हा महिलांचा प्रवास कधी स्वयंपूर्ण शेती करण्याकडे झाला तर कधी आशा कार्यकर्ती बनून आरोग्याचे प्रश्न सोडवण्याकडे झाला. या महिला कधी घरातले यजमानपद समर्थपणे सांभाळताना दिसतात तर कधी गावाचे सरपंचपद शोभवताना!

या सगळ्या प्रयत्नाला २५ वर्षं झाली! आता सर्व वयोगटाच्या मुली-महिलांसाठी या कामाचा विस्तार झाला. आजीपासून बचत गटाचे सुरू झालेले हे काम आता नातीच्या पिढीसाठी किशोरी विकास या अंगाने चालू आहे. तर मुलींसोबतच सुनांचा सहभाग वाढवणारा उपक्रम म्हणजे मातापालक प्रशिक्षण करणारा 'हिरकणी' उपक्रम. अशीही भर आता कामात पडली आहे.

आपल्याच गावात नांदायचे थाटात
भिऊन शान आता भागायचे नाय ..

ही गाण्यातली ओळ त्यापलीकडे जाऊन स्वभाव बनली आहे. यामुळे समाजातला ग्रामीण महिलेचा वावर उठून दिसण्याइतका वाढला आहे... त्यामुळे 'ती'ची दखलही गावात घेतली जायला लागली आहे. हे आता वेगळे सांगायला नकोच!

## ३. गावचा दाखला

सविता मूळची माजगावची! १०वी पर्यंतचे शिक्षण तिने वेल्ह्यातील अतिशय दुर्गम अशा माजगाव या छोट्याशा २५ घरांच्या वाडीत राहूनच पूर्ण केले. जिथे आजही रस्ता पोहचला नाही, नि शाळेची सोयही नाही म्हणून रोज पायी १२ किमी. चालणारी ही सविता. घरची परिस्थितीही तशी बेताचीच. घरी आई-वडील भात शेती करतात, शहरात एक भाऊ हॉटेलमध्ये काम करतो. सविताने भाड्याच्या खोलीत राहून अकरावीचे वर्ष पूर्ण केले. पण पुढील शिक्षण पूर्ण होणे तिला अवघड वाटत होते कारण घरात तिची लहान २ भावंड ही शिकत होती. भाड्याच्या खोलीत राहून १२वी चे शिक्षण पूर्ण करणे परवडणारे नव्हते. जर कोठे राहण्याची सोय झाली तरचं १२वी पूर्ण होण्यासारखे होते कारण घरून म्हणजेच माजगावातून वेल्ह्यात येऊन-जाऊन करणेही शक्य नव्हते. म्हणून तिने वेल्ह्यातील प्रबोधिनीच्या निवासात प्रवेश घ्यायचा ठरवले आणि निवासात प्रवेश मिळाला.

सविताची बारावीची परीक्षा संपली. माजगावातील बारावीची परीक्षा दिलेली ही पहिलीच मुलगी. आजपर्यंत गावात १२वी झालेलं कोणीच नव्हते. सायन्सला प्रवेश घेतल्यावर डॉक्टर होता येतं एवढंचं माहित होतं त्यामुळे मला डॉक्टर व्हायचंय असं स्वप्न बघत ११वी सायन्सला प्रवेश घेतला होता. काही कारणांमुळे NEETच्या परीक्षेचा फॉर्म न भरल्यामुळे डॉक्टरकीला प्रवेश घेता येणार नव्हता. पण सविता आता निवासात राहत असल्यामुळे तिला समजले होते की सायन्सला प्रवेश घेतल्यावर फक्त डॉक्टर होता येतं असं नाही, तर बाकीही बरेच कोर्सेस करता येतात. हे समजल्यावर आपण डॉक्टर नाही तर नर्स तरी होऊ, असे म्हणून CET चा फॉर्म भरायला निघाली.

त्यादिवशी CET चा फॉर्म भरायची शेवटची तारीख होती. फॉर्म भरायला घेतला आणि category भरताना तिला विचारलं, 'कायं गं कोणत्या category मध्ये मोडतेस तू?' तिने उत्तर दिलं, 'भरून टाका की open हायं म्हणून काय फरक पडतोयं'. सविता खरं तर धनगर समाजातली पोरगी अर्थातच NT category मध्ये मोडणारी. तिनं असं उत्तर दिल्यावर आश्चर्यच वाटलं थोडं. तिला माहितच नव्हतं की open मध्ये फॉर्म भरला तर पुढे काय होणार आहे ते. अशा फॉर्म भरायच्या शेवटच्या दिवशी नक्की काय करावं हेच कळेनासं झालं. पण त्या क्षणाला फॉर्म भरायचा थांबवला. सकाळची वेळ होती. असं वाटलं की, आपल्या हातात अजून अख्खा दिवस आहे काहीतर प्रयत्न केलाच तर नक्कीच सविताच पुढचं शिक्षण पूर्णपणे एकही रुपया न भरता होणार होतं.

फॉर्म भरायचा थांबवून प्रबोधिनीचे काम करत असणाऱ्या एका ताईंना भेटायला आम्ही दोघी गेलो. त्यांच्या ओळखीने तहसीलकचेरी मधील काम व्हायला मदत होणार होती, म्हणून त्यांनाच घेऊन तहसीलकचेरीमध्ये गेलो. परंतु काही कारणांमुळे काम होऊ शकले नाही. एकीकडे फॉर्म भरायची संपण्याची वेळ जवळ येत होती आणि एकीकडे कचेरीमध्ये कोणीच असं भेटलं नाही की, जे आम्हाला सांगतील की, कागदपत्र मिळाले तर जातीचा दाखला मिळेल. अकरावीत असताना सविताला शिक्षकांनी सांगितले म्हणून फक्त कचेरीमध्ये जातीच्या दाखल्याची चौकशी केली होती. तर तिला कार्यालयात तलाठ्यांनी विचारलं की, 'गाव कुठलं?', तिने सांगितलं, 'माझं गाव माजगाव.' त्यावर तिला तलाठ्यांकडून उत्तर मिळालं होतं की, 'माजगाव गावचे १९६१ पूर्वीचे कुठलेच पुरावे मिळत नाहीत.' सविताला जातीच्या दाखल्याचे महत्त्वच माहित नसल्याने परत दाखला काढण्यासाठी धडपड करायची वेळच आली नाही. हे सगळं तहसीलकचेरी मधून बाहेर पडताना तिने सांगितले. तिने असं सांगितल्यावर पुढे नक्की काय करावं हा मोठा प्रश्नच होता!

कचेरीमध्ये दोन चकरा मारून ही रिकाम्या हातांनी बाहेर पडत असताना तिला समजावून सांगितले की, जातीचा दाखला असेल तर शिक्षणात पैशांची सूट मिळते, नोकरीसाठीही त्याचा उपयोग होतो. हे सांगताच सविताने माझ्याकडे पाहिलं आणि म्हणाली, ' होयं कायं ताई, आजपर्यंत कोणीच मला असं सांगितलंचं नायं, मला माहित असतं तर कधीच दाखला काढला असता. पण आता काय करू ते सांगा!' तोपर्यंत संध्याकाळ होत आली होती. मलाच समजत नव्हते की आता काय करावे. पण तिला शिकायचेच असेल तर तिने धडपड करावी म्हणून तिला विचारले की, 'तू स्वतः यासाठी प्रयत्न केलेस तर दाखला नक्की मिळेल.' त्यावरं तिनं उत्तरं दिलं, 'मी प्रयत्न करायला तयार आहे. पण मला जिथं-जिथं अडचणी येतील तिथं-तिथं मदत कराल का?'

शेवटी त्या दिवशी संध्याकाळी ७:०० वाजता फॉर्म भरला आणि तो ही NT-C category मधूनच! फॉर्म भरल्यावर मात्र सविताची दाखला काढण्याची धडपड सुरू झाली. मागील वर्षी रखडलेले काम यावर्षी संस्था पाठीशी असल्याने मार्गी लागण्यास मदत झाली. वेल्हे निवासात राहत असल्याने कचेरीमध्ये कामासाठी चार चकरा मारता येणेही शक्य झाले. तिने जातीच्या दाखल्यासाठी लागणाऱ्या सगळ्या कागदपत्रांची जुळवाजुळव सुरू केली. पण प्रश्न आला तो फक्त १९६१ पूर्वीच्या पुराव्याचा. तिने ठरवलं आणि ती स्वतः पुराव्याचे कागद शोधण्यासाठी कचेरीमध्ये पोचली. एक ते दोन तासांची ही शोध मोहिम यशस्वी ठरली. सविताला १९६१ पूर्वीची खापर पणजोबांची १९४३ सालची मोडी लिपीतील जन्म-मृत्यू नोंद असलेली कागदपत्रे सापडली. माजगावचे पुरावे सापडले म्हणून ती खूप आनंदी होती. आता मात्र हे मोडी लिपीतील कागदपत्रे मराठीत भाषांतरित करावे लागणार होते. तिने ते ही वडिलांच्या मदतीने पुण्यात जाऊन करून घेतले. या कामासाठी तिला काही पैसे ही मोजावे लागले. पण जातीच्या दाखल्याचे महत्त्व समजल्यामुळे येथे पैसे गेल्याचे काहीच दुखः नव्हते. खरंतर कागदपत्रावाचून एका मुलीचे शिक्षण अडतंय म्हणून सर्वांनी आनंदाने मदत केली आणि काही दशकांत जे घडलं नव्हतं ते घडलं!

त्यामुळे आता जातीचा दाखला काढण्यासाठी लागणारी सर्व कागदपत्रे जमा झाली आणि एकदाचा जातीचा दाखला मिळण्यासंदर्भातला फॉर्म भरला! या सगळ्या खटपटीत कमीत-कमी २०-२५ दिवस गेले. कागदपत्रांची जुळवा-जुळव करत असताना ती सांगायची - गावातली लोकं म्हणतायत की, 'लगीन करा पोरीचं, लगीन करायचं वय हाय अन् तुमी

श्रद्धांजली!

स्त्री शक्ती प्रबोधनाचे ग्रामीण भागातील काम जे सध्या सुरू आहे, त्या कामाचा पाया 'शब्द ते शक्ती' या प्रकल्पामुळे घातला गेला . या आणि अशा अनेक ग्रामीण महिलाच्या विकासाच्या प्रकल्पासाठी ज्यानी गेली अनेक वर्ष सढळ हाताने आर्थिक सहाय्य केले व मार्गदर्शन केले असे ज्येष्ठ उद्योजक श्री. अनंत सेटलवाड यांना ५ ऑगस्ट २०२० रोजी देवाज्ञा झाली. त्यांना विनम्र श्रद्धांजली!

कसली कागदं गोळा करत बसलाय्, कागदं काढून काय व्हनार जे आज पतुर झालं नाय्, अन् तसं बी पोर किती शिकणार जिच्यासाठी ही इतकी धडपड'. हे ऐकून तिला खूप वाईट वाटायचे. पण गावातल्या लोकांना उत्तरं देत तिला जे काम पूर्ण करायचे होते ते काम तिने पूर्ण केलेच.

आज परिस्थिती बदलली आहे. फॉर्म भरल्यानंतर १५ दिवसांनी धनगर जातीचा दाखला सविताच्या हातात मिळाला. दाखला मिळाल्यावर सविताने गावकऱ्यांना जातीच्या दाखल्याचे महत्त्व पटवून दिले. आज सविताबद्दल तेच लोक म्हणतात की, 'सविता आता लय हुशार झालीय्, तिला आता समदं समजाया लागलय, एक कागुद काढायचं म्हटलं तर काय सोपं काम नाय्. एवढ्या वर्षात कोणाला जमलं नाय, पण पोरीनं काम करून दाखिवलं'. आता सावितामुळे सगळ्या गावाची कागदपत्रे निघायला मदत होईल, कारण गावाचे हरवलेले पुरावे सविताच्या निमित्ताने सापडले. आज लोकं सवितालाच विचारायला येतात की, 'पोरी काय-काय करावं लागल दाखला काढायला?' आणि सविता आनंदाने सांगते.

सविताचे दाखला काढण्याचे काम तर पूर्ण झालेच पण सविताला पुढील शिक्षणासाठी शहरात जावे लागणार होते. संस्थेवर असलेल्या विश्वासामुळे तिच्या घरच्यांनी तिला पुण्यात शिकायला पाठवायचं धाडस केलं. सविताच्या पुढील शिक्षणाच्या प्रवेशाने घरच्यांना, तायांना, निवासातील मुलींना नि गावकऱ्यांना देखील आनंद झाला.

खरं तर २१व्या शतकात आजही संपूर्ण गावाचे पुरावे सापडत नाहीत असं ऐकून शांत बसणारे लोक कित्येक गावात असतीलही, परंतु सवितासारखी एखादीच असेल की, जिच्या प्रयत्नांमुळे संपूर्ण गावाचे जातीचे दाखले निघायला ती कारणीभूत ठरली!

*****

## ४. करोना आपद मदतकार्य

जरी वृत्त कालावधी एप्रिल २०१९ ते मार्च २०२० असला तरी हे वृत्त हातात पडेल तेव्हाही मार्चपासून सुरू झालेल्या करोनाची छाया आहे. म्हणून करोना मदत कार्याच्या एप्रिल व मे २०२० महिन्यातल्या निवडक कामाची माहिती येथे देत आहोत.

१. **भाजी विक्री :** लॉकडाऊनमुळे भाजी बाजार बंद होता. भाजी विकायला अत्यावश्यक सेवा म्हणून परवानगी होती पण उपलब्ध होत नव्हती. गावात भाजी पिकली होती पण वाहतूक बंद असल्यामुळे पुण्यात आणता येत नव्हती. त्याची सांगड घालून १५ दिवसांत ६५०० पेक्षा जास्त किलो भाजी, फळे विकत घेऊन पुण्यात विकली. त्याची जवळ-जवळ रु. २,००,०००/- ची उलाढाल झाली.

२. **शिधा वाटप :** २३ कातकरी, ५० एकल महिला, ६६ वृद्ध नागरिक, २०९ मजूर ९३ वस्तीवर असे एकूण ६६ गावांतील ४५१ जणांना शिधा वाटप केले. प्रत्येकी किमान रु.६००/- गावातले व मजुरांसाठीचे रु.१०००/- रकमेचे होते. यासाठी स्थानिक खरेदी ९०,०००/- रुपयाच्या आसपास झाली.

३. **आकाशवाणीवर निवेदन :** वरील विषय १ व २ चा व्हॉटस ॲपमुळे खूप प्रचार झाला. डॉ. कानिटकर यांच्या संपर्कामुळे पुणे आकाशवाणीवर ५ मिनिटाचे निवेदन करायची संधी मिळाली.

४. **शेती संबंधी:** बियाणे वाटप केले. (भुईमूग १० किलो, मुग दीड किलो, पावटा १० किलो, चवळी ५ किलो) नवीन भाजीच्या बिया : कारले ३५० ग्रॅम, गवार २५० ग्रॅम, दोडके १०० ग्रॅम, भेंडी १०० ग्रॅम, मुळा १०० ग्रॅम, वांगी १०० ग्रॅम असे बिया वाटप केले.

५. **बजाज प्रकल्प लढा करोनाशी :** एका महिन्याच्या या प्रकल्पासाठी २० गावांतील २० जणींनी यासाठी काम केले. २० झूम मिटिंगच्या साहाय्याने निवेदने झाली.

i) गुगल फॉर्मच्या माध्यमातून १,६८१ लोकांपर्यंत करोना जाणीव-जागृती निमित्ताने आम्ही पोचलो.

ii) २१ गावांतून **जाणीव-जागृती करायला जीपवर लाऊड स्पीकर लावून गाडी फिरली**. शिवारात पेरणी करताना लोकं करोनाची माहिती ऐकत होते, अस्कवडी गावात पोलीस पाटलांनी ज्ञान प्रबोधिनीच्या वतीने गावातील

लोकांना कोविड संदर्भातील माहिती सांगण्यासाठी विनंती केली. त्यानंतर तृप्तीताईंनी माईक वरून माहिती सांगितली. असे काय काय केले. एकूणात काय, तर नवीन पद्धत वापरून हा प्रकल्प यशस्वी तर झालाच पण त्या शिवाय कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवणारा ठरला.

iii) २० गावात **करोना संबंधी पोस्टर** लावले.

iv) ४० कार्यकर्त्यांना मास्क व सॅनिटायझरचे वाटप केले.

v) **डॉक्टर संवाद** : (माजी विद्यार्थिनी) बालरोगतज्ञ डॉ. प्राजक्ता दोशी (स्वच्छता), दंत वैद्य डॉ. वैदेही केळकर (नाक, घसा आरोग्य) व स्त्रीरोगतज्ञ डॉ. वैशाली बिनीवाले (गरोदरपण) या बोलल्या.

VI) वकील जयश्री तुंगार यांनी **कौटुंबिक हिंसाचार** या विषयावर अंगणवाडी कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण केले.

६. **औषधे वाटप** : बाल आरोग्य तपासणी करून मुलांना डॉ. प्राजक्ता दोशी यांच्या सल्ल्याने vitamin ची औषधे व सर्दी, खोकला यावरचे paracetimol, crosin cough syrup याचे वाटप केले.

७. **गरोदर महिलांना मार्गदर्शन** : गरोदर महिलांनी घ्यायची काळजी या विषयावर डॉ. वैशाली बिनीवाले आशा वर्कर व कार्यकर्त्यांशी झूम मिटींगमध्ये बोलल्या. शैलाताई यांनी गरोदर महिलांच्या गाववार जाऊन भेटी घेतल्या व औषधांचे वितरण केले.

८. **करोना बराही होऊ शकतो:** करोनाची धास्ती सुरुवातीला गावांमध्ये एवढी होती की करोना झालेले कोणी बरे झाले असे दिसतच नव्हते, त्यामुळे वेल्ह्यातील पहिल्या करोनाग्रस्त महिलेची कार्यकर्त्यांसाठी मुलाखत घेतली. करोना बराही होऊ शकतो, याचे उदाहरण त्यानिमित्ताने सगळ्यांना कळले.

९. **दुकानदारांना किराणा पुरवला** : माजगाव, खोपडेवाडी, कोंढाळकरवाडी या तीन गावांमध्ये किराणा माल विक्रीसाठी दिला. विक्रीची जबाबदारी या गावांमध्ये मुळात राहत असणाऱ्या आपल्या निवासातील मुली व त्यांच्या पालकांनी घेतली आहे. सर्व मिळून साधारण किंमत रु. ७५०००/-

१०. **आरोग्य किट वाटप** : मर्स्क कंपनीच्या निधीतून ५० जणींना संच दिले. त्याशिवाय गरज म्हणून आपल्याकडे जमा झालेल्या रोख देणगीतून भट्टी, पासली, कोदापूर, वेल्हे, धानेप या ५ गावात ६ **आरोग्य किटचे वाटप** केले. मुलांनी परसबागेत बिया लावायला सुरुवात केली.

११. मावळात **परसबागेच्या बियांचे वाटप** : माजगाव, पासली, जाधववाडी, वेल्हे येथे परसबागेच्या बियांचे एकूण ६४ पुड्यांचे वाटप केले.

१२. **शेतीसाठी अर्थसाहाय्य** : केंद्र सरकारने जाहीर केलेले कर्ज सेन्ट्रल बँकेत खाते असणाऱ्या खोपी, निधान, सांगवी या ३ गावांतील ७ बचत गटांना कर्ज वाटप केले. गटातील ९४ महिलांना प्रत्येकी रु. ५,०००/- प्रमाणे ४ लाख ७० हजार रक्कम वाटप करण्यात आली. तर विजया बँकेने रांझे गटाला ६५,००० रु. दिले. अजून बाकी प्रक्रियेत आहेत.

१३. **मास्क शिलाई**: राम-सीता तंत्र निकेतन मध्ये स्वाती व त्यांच्या गटाने १०००+ मास्क शिवून दिले.

हे सगळे काम करायला देणगीदारांनी भरभरून अर्थबळ दिले त्यामुळे केवळ गरजेप्रमाणे गावागावात काम करता आले.

*****

**ज्ञान प्रबोधिनीला दिलेल्या देणग्या आयकर कायद्याच्या परि. ८० (जी) खाली करमुक्त आहेत.**

**'ज्ञान प्रबोधिनी' या नावाने धनादेश काढावा**

संपर्क : **ज्ञान प्रबोधिनी : स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण),**

५१० सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० दूरभाष : (०२०) २४२०७१६२/१३३

शिवापूर : खेड-शिवापूर वाडा, ता. हवेली, जिल्हा पुणे, ४१२२०५

आंबवणे : मातृछाया, ता. वेल्हे, जिल्हा पुणे ✓ वेल्हे : पोलिस स्टेशन जवळ, ता. वेल्हे, जिल्हा पुणे

